नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक २१ * * अमरावती * सोमवार, दिनांक २१ जुलै २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

## आ. रोहित पवारांवर गुन्हा दाखल

मुंबई, दि.२० प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे आमदार रोहित पवार यांच्याविरुद्ध मुंबई पोलिसांनी शासकीय कर्मचाऱ्याच्या कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. मुंबईतील आझाद मैदान पोलीस ठाण्यात ही कारवाई करण्यात आली असून एका व्हायरल व्हिडिओमध्ये रोहित पवार पोलीस उपनिरीक्षकावर मोठ्याने ओरडताना दिसत आहेत. या घटनेचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला असून, त्यामध्ये रोहित पवार एका पोलीस अधिकाऱ्यावर "आवाज कमी ठेव, नाहीतर धडा शिकवीन" असे म्हणताना स्पष्टपणे ऐकायला मिळते.

* विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्रलेख

## खरीखरी

### ट्रम्पचे तेच ते गाणे

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हा माणूस स्वतःला ट्रम्पचा एक्का समजतो परंतु तो पत्त्यांमधील जोकर आहे. हे आता सिद्ध झालेले आहे भारत पाकिस्तान संघर्षाबाबत हा संघर्ष मीच थांबविला अशी बडबड अनेक वेळा या माणसाने केलेली आहे. आपल्या कोणत्याही गोष्टीचे उत्तर न देण्याच्या परंपरेला जागून आपण त्याबाबत कोणतेच उत्तर देत नाही, ते का देत नाही त्याचे रहस्य उत्तर न देणारेच जाणोत. एक गोष्ट मात्र पक्की आहे की आजही जगातील महाशक्ती फक्त अमेरिकाच आहे. या अमेरिकेत जगामधील अनेक राष्ट्रातील तज्ज्ञ आणि बुद्धिमान मंडळी नोकरीला आहेत म्हणजेच जगातील सर्वोत्तम हुशारी लाभलेले लाखो बुद्धिजीवी सध्या अमेरिकेत वास्तव्याला आहेत. अशा या अमेरिकेमध्ये ट्रम्प सारखा माणूस अध्यक्षपदावर निवडून येतो ही मोठी नवलाचीच गोष्ट आहे. या माणसाने स्वतःचे कितीही कौतुक करावे याचा त्याला स्वतःला कसलाच धरबंध नाही. आपल्याला शांततेचे नोबेल पारितोषिक मिळावे असे स्वतःच ट्रम्प जोर जोरात ओरडत असतात, आपणच भारत आणि पाकिस्तान मधील संघर्ष थांबवला आणि त्याच लढ्यात पाच लढाऊ विमाने पाडली असेही ते म्हणतात. आता ही लढाऊ विमाने भारताची होती की पाकिस्तानची होती हे काही ट्रम्प सांगत नाहीत. व्हाईट हाऊस मध्ये आपल्या पक्षाच्या सिनेटर्ससाठी भोजनाचे आयोजन त्यांनी केले होते तिथेही हे ट्रम्प महाराज पुन्हा आपली महती वदते झाले. भारत आणि पाकिस्तान हे दोन्ही देश अण्वस्त्रधारी आहेत युद्धामधली स्थिती अत्यंत बिकट झाली असती. हे पाहून अंतरंगात अशांत असलेल्या ट्रम्पने स्वतःच सांगितले की आपण शांतीची वार्ता केली. नाहीतर हे दोन्ही देश युद्धात अण्वस्त्रांनी एकमेकांवर हल्ला करणार होते असा जावई शोधही या ट्रम्पानेच लावला. आपण व्यापारी करार करू असे दोन्ही देशांना सांगितले आणि मग हा संघर्ष थांबला असे ट्रम्प यांचे म्हणणे आहे. ट्रम्प महाशय किती खोटारडे आहेत याचा हा ढळढळीत पुरावा आहे. हा माणूस पाकिस्तानवादी आहे कारण पाकिस्तानची लढाई करण्याची क्षमता भारताने जवळजवळ नष्ट करून टाकली होती. अजून दोन-तीन दिवस युद्ध चालले असते तर पाकिस्तानचा पराभव अटळ होता त्यामुळे पाकिस्तानने भारतावर गरळ रोखण्याएवजी ट्रम्पला गळ घातली आणि कसेही करून युद्ध थांबवा अशी विनंती केली. १९७१ च्या लढाईमध्ये अमेरिकेने आपले सातवे आरमार भारताकडे वळवण्याचे जवळ जवळ आदेश दिले होते, मात्र आपल्या भारताच्या तत्कालीन बलाढ्य पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी तेव्हाच्या पाकिस्तानवादी अमेरिकी राष्ट्राध्यक्ष निक्सनला प्रतिआव्हान देण्यासाठी सोवियत संघाबरोबर करार केला आणि मग अमेरिकेने तिथून यु टर्न घेतला. आता यावेळी अमेरिकेने सांगितले आणि आपण एकले, याबाबतीत आपल्यासारख्या पामरांनी राज्यकर्त्यांना दोष देणे शक्यच नाही. कारण राजा नेहमी बरोबरच असतो तसेच आताची लढाई फक्त सैन्याच्या भरवशावर होत नसते. पाकिस्तान जवळ किती लाख सैनिक आहेत आणि आपल्याजवळ किती लाख सैनिक आहेत याची चर्चा करण्याची गरज जवळपास संपलेली आहे, बहुधा म्हणूनच चार वर्षाच्या करारावर सैनिकांची भरती होत असावी. आताच्या लढाया महाभारत कालीन किंवा रामायण कालीन युद्धासारख्या होत असतात, त्या काळामध्ये समोरासमोर सैनिक युद्ध करीत आणि मंत्रोच्चारासह बाणाचा मारा करून विरुद्ध सैन्याला नामोहरम करीत असत. अर्जुनाने त्याचा पुत्र अभिमन्यूला जयद्रथाने कुरुक्षेत्रावरील युद्धात कपटाने मारले होते. दुसऱ्या दिवशीच्या सूर्यास्तापूर्वी जयद्रथाचा शिरच्छेद करू अन्यथा अग्नी काष्ठ भक्षण करू, अशी प्रतिज्ञा अर्जुनाने केली मात्र अचानक सूर्यास्त झाला आणि अर्जुनाने प्रतिज्ञेप्रमाणे अग्नी काष्ठ भक्षणाची तयारी केली. सूर्यास्तामुळे क्षत्रिय धर्माचे पालन करणाऱ्या अर्जुनाला प्रतिज्ञेची पूर्ती करणे भाग होते. अर्जुनाचा अशा प्रकारचा पाडाव पाहण्यासाठी कौरवांकडचे सगळे अतिरथी, महारथी जयद्रथासोबत त्या ठिकाणी हजर झाले आणि तेवढ्यात चमत्कार झाला कारण सूर्य मावळलाच नव्हता. ग्रहणामुळे लुप्त झालेला सूर्य आकाशात तळपू लागला आणि मग भगवान श्रीकृष्ण म्हणाले की हा सूर्य आणि हा जयद्रथ, लगेचच अर्जुनाने क्षणार्धात आपल्या गांडीवाने जयद्रथाचे डोके धडापासून वेगळे करून टाकले आणि ते त्याच्या बापाच्या मांडीवर बाणाच्या माऱ्याने पाठवून दिले कारण जयद्रथाचे डोके त्याच्या बापाच्या हातून पडले तरच तो मरणार होता. ही कथा सांगण्याचे कारण असे आहे की आता जगात आणि भारतात अगदी यत्र-तत्र सर्वत्र असे अद्ययावत ड्रोन वगैरे अस्तित्वात आहेत. विशेष म्हणजे भारताजवळ ड्रोनही होते आणि पाकिस्तानचे ड्रोन नष्ट करण्याची साधनेही होती तरीही ट्रम्पादेशाने दोन्ही पक्ष एकदम शांततावादी झाले. जर ते झाले नसते तर पाकिस्तानच शांत झाले असते, असे आपल्याकडचे अनेक महावीर म्हणतात. दयाळू भारताने ट्रम्प यांना नोबेल मिळावे म्हणून बहुधा हे नोबेल काम केले असावे. आपण ट्रम्प यांच्या विधानाचा इन्कार करत नाही, असे स्पष्टीकरण सरकारने कशाला बरे द्यायचे ज्याला जे समजायचे ते समजावे. कारण आपणही शांतिदूत आहोत आपणही एक लढाई थांबवण्यासाठी प्रयत्न केले होतेच. त्यामुळे शांततेच्या नावानं चांगभलं असं म्हणता येईल.

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

# 'ऑपरेशन सिंदूर'वर चर्चेस सरकार तयार

## आजपासून संसदेचे पावसाळी अधिवेशन | विरोधकांच्या मागणीला यश

नवी दिल्ली, दि. २० वृत्तसंस्था

येत्या सोमवारपासून संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू होत आहे. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी रविवारी सांगितले की, या अधिवेशनात 'ऑपरेशन सिंदूर'सह सर्व महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यास सरकार तयार आहे. पावसाळी अधिवेशनापूर्वी बोलावण्यात आलेल्या सर्वपक्षीय बैठकीत ते हे बोलत होते. संसदेचे कामकाज सुरळीत चालविण्यासाठी सरकार आणि विरोधी पक्षांमध्ये चांगले समन्वय असले पाहिजे, असे आवाहनही रिजिजू यांनी सर्व पक्षांना केले.



अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या अलिकडच्या विधानावरून विरोधी पक्ष सरकारला घेरण्याची तयारी करत आहे, ज्यामध्ये त्यांनी भारत आणि पाकिस्तानमध्ये मध्यस्थी करून युद्धविराम आणल्याचे म्हटले होते. यावर प्रतिक्रिया देताना रिजिजू म्हणाले की, सरकार संसदेत या मुद्द्यावर योग्य उत्तर देईल.

न्यायाधीश वर्मा यांना हटविण्यासाठी आणण्यात येणाऱ्या महाभियोग प्रस्तावाला खासदारांचा चांगला पाठिंबा मिळत असल्याची माहिती संसदीय कामकाज मंत्री रिजिजू यांनी दिली. ते म्हणाले की, १०० हून अधिक खासदारांनी या प्रस्तावावर स्वाक्षरी केली आहे.

बैठकीत विरोधकांनी अनेक महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले, जे ते संसदेत मोठ्याने उपस्थित करणार आहेत. यामध्ये बिहारमधील मतदार यादीच्या विशेष सुधारणा (एसआयआर) मध्ये अनियमिततेचे आरोप, अलिकडचा पहलगाम दहशतवादी हल्ला आणि ट्रम्प यांचा वादग्रस्त दावा यांचा समावेश आहे. काँग्रेस खासदार गौरव गोगोई म्हणाले की त्यांचा पक्ष तीन प्रमुख मागण्यांसह संसदेत पोहोचेल:

- पंतप्रधान मोदींनी ट्रम्पच्या दाव्यावर संसदेत निवेदन द्यावे.
- पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील सुरक्षेतील त्रुटींबद्दल सरकारने उत्तर द्यावे.
- बिहारमधील मतदार यादी पुनरावृत्ती प्रक्रियेची चौकशी करावी.
- आम आदमी पक्षाने 'निवडणूक घोटाळा'चा मुद्दा उपस्थित केला

आप खासदार संजय सिंह यांनी बैठकीत एसआयआर प्रक्रियेला "निवडणूक घोटाळा" म्हटले आणि ते म्हणाले की ते देशाच्या लोकशाहीसाठी गंभीर धोका आहे. त्यांनी भारत-पाकिस्तान मध्यस्थीबाबत ट्रम्पच्या विधानांवरही चिंता व्यक्त केली.

ही बैठक सभागृह नेते आणि केंद्रीय मंत्री जेपी नड्डा यांच्या अध्यक्षतेखाली राज्यसभेत झाली. सरकारच्या वतीने किरेन रिजिजू आणि राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी बैठकीला हजेरी लावली. विरोधी पक्षाच्या वतीने काँग्रेसचे गौरव गोगोई आणि जयराम रमेश, राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार गट) सुप्रिया सुळे, द्रमुकचे टीआर बाळू, आरपीआय (अ) चे रामदास आठवले यांनी बैठकीला हजेरी लावली.

### सरकार आठ नवी विधेयके सादर करणार

केंद्र सरकार सोमवार (२१ जुलै २०२५) पासून सुरू होणाऱ्या पावसाळी अधिवेशनात एकूण आठ नवे विधेयक सादर करण्याची योजना आखत आहे, ज्यामध्ये भू-विरासत स्थळे आणि भू-अवशेषांचे संरक्षण व सुरक्षा यांच्याशी संबंधित एक विधेयकही समाविष्ट आहे. पावसाळी अधिवेशनासाठी प्रस्तावित विधेयकांमध्ये राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयक, भू-विरासत स्थळे आणि भू-अवशेष (संरक्षण आणि देखभाल) विधेयक, खाण आणि खनिज (विकास व विनियमन) दुरुस्ती विधेयक आणि राष्ट्रीय डोपिंगविरोधी (दुरुस्ती) विधेयक यांचा समावेश आहे.

## मी रमी खेळत नव्हतो- माणिकराव कोकाटे

मुंबई, दि. २० प्रतिनिधी

राज्याचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे हे त्यांच्या वादग्रस्त विधानांमुळे अनेकदा वादात अडकले होते. आता विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन नुकतेच संपले असून या अधिवेशनात ते सभागृहातच मोबाइलवर रमी गेम खेळत असल्याचा एक व्हिडीओ समोर आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी हा सदर व्हिडीओ एक्सवर शेअर केला होता. त्यानंतर विरोधकांनी माणिकराव कोकाटे यांच्यावर जोरदार टीका केली. यानंतर आता खुद्द माणिकराव कोकाटे यांनी यावर प्रतिक्रिया दिली आहे. तसेच आपण सभागृहात गेम खेळत नव्हतो, असे स्पष्टीकरण दिले आहे.



माध्यमांना प्रतिक्रिया देत असताना म्हणाले, "मी विधानपरिषदेत कामकाजासाठी बसलो होतो. तेव्हा सभागृह काही वेळासाठी तहकूब झाले असावे. म्हणून मी खालच्या सभागृहात (विधानसभेत) काय कामकाज सुरू आहे, हे पाहण्यासाठी मी युट्यूबवर गेलो होतो. युट्यूबवर व्हिडीओ सुरू केल्यानंतर जाहिराती येत असतात. त्याप्रमाणेच त्यावेळी सदर जाहिरात आली. मी जाहिरात स्किप करून पुढे गेलो. पण व्हिडीओ व्हायरल करणाऱ्यांनी फक्त १८ सेकंदाचाच व्हिडीओ दाखवला."

माणिकराव कोकाटे पुढे म्हणाले, माझ्यावर विरोधी पक्ष वैयक्तिक टीका करतो. कधी माझ्या कपड्यांवर कधी एखाद्या विधानावर टीका केली जाते. पण माझ्या धोरणांवर, कामावर किंवा मी शेतकऱ्यांसाठी केलेल्या उपाययोजनांवर विरोधी पक्ष कधीही बोलत नाही. माझे काम पारदर्शी आहे, माझा स्वभाव स्पष्ट आहे. विधिमंडळाच्या सभागृहात कॅमेरे आहेत. तिथे अनुचित प्रकार करू नये, याची मला पूर्ण कल्पना आहे. मग मी गेम का खेळेल?

माणिकराव कोकाटे यांचा व्हिडीओ सत्ताधाऱ्यापैकीच कुणीतरी काढला असावा, असा आरोप होत आहे. याबाबत प्रश्न विचारला असता ते म्हणाले की, व्हिडीओ काढला त्याबाबत मला आक्षेप नाही. पण या व्हिडीओच्या माध्यमातून मला लक्ष्य करण्यात येत आहे. रोहित पवार यांनी कृषी क्षेत्रासाठी काय काम केले आहे? असा सवाल कोकाटे यांनी उपस्थित केला.

माणिकराव कोकाटे पुढे म्हणाले, "युट्यूबवर कुणीही व्हिडीओ सुरू केल्यानंतर त्यावर रमी खेळाच्या जाहिराती येतात. रोहित पवार यांच्याही मोबाइलमध्ये त्या येत असतील. सोशल मीडियावर जाहिराती येतच असतात. पण कुठल्या गोष्टीचे भांडवल करावे आणि करू नये, याचे रोहित पवारांना भान असावे."

माणिकराव कोकाटे राज्याचे जबाबदार मंत्री आहेत. त्यांनी व्हायरल व्हिडीओवर स्वतः खुलासा केला आहे. त्यांना काही सूचना द्यायच्या असतील तर त्या देईल, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी दिली.

## अमित शाह महायुतीमधील चार मंत्र्यांना डच्चू देणार - संजय राऊत



### महाराष्ट्रात अमानुष पद्धतीने राज्यकारभार सुरू

मुंबई, दि. २० प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) नेते आणि राज्याचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे हे सभागृहातच मोबाइलवर गेम खेळताना आढळल्यानंतर आता विरोधक यावर टीका करत आहेत. यंदाचे पावसाळी अधिवेशन बऱ्याच कारणांसाठी गाजले. शिवसेनेचे (शिंदे) आमदार संजय गायकवाड आणि मंत्री संजय शिरसाट यांचे आक्षेपार्ह व्हिडीओ व्हायरल झाले. त्यानंतर अधिवेशन संपताच आता माणिकराव कोकाटे यांचा व्हिडीओ समोर आला आहे. महायुतीच्या सरकारमध्ये तीन पक्षांचे मंत्री असून भाजपा वगळता इतर दोन पक्षातील अनेक मंत्र्यांवर विविध कारणांमुळे टीका झाली आहे. आता मंत्रिमंडळातील काही मंत्र्यांना बाहेरचा रस्ता दाखवला जाऊ शकतो, असा दावा शिवसेनेचे (ठाकरे) नेते संजय राऊत यांनी केला आहे.

महाराष्ट्रात अमानुष पद्धतीने राज्यकारभार सुरू आहे. तीन महिन्यात महाराष्ट्रात ६५० हून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. काही दिवसांपूर्वी दोन शेतकरी त्यांच्या प्रश्नांसाठी लातूरहून मुंबईला चालत आले. त्यांच्या प्रश्नांकडे लक्ष द्यायला आमच्या कृषीमंत्र्यांकडे वेळ नाही. कृषी मंत्र्यांच्या मागच्या काळातील विधाने पाहिली तर सरकारने कृषी क्षेत्राला काय योगदान दिले आहे, हे कळून येईल, अशी टीका संजय राऊत यांनी केली.

संजय राऊत पुढे म्हणाले, "सरकारमधील कुणाचे व्हिडीओ पैशांच्या बॅगेबरोबर दिसत आहेत. कुणी आमदार निवासात मारहाण करत आहे. कुणी विधानभवनातच मारामाऱ्या करत आहे, अशी महाराष्ट्राची परिस्थिती आहे. तर कुणी सभागृहात मोबाइलवर गेम खेळत आहे. अमित शाह यांनी चार मंत्र्यांना डच्चू देण्याचे सुचविले आहे. त्यात कृषी मंत्री कोकाटे यांच्याही नावाचा समावेश आहे. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना याबाबत कल्पना देण्यात आली आहे. त्यात संबंधित कृषी मंत्र्यांचे नाव असल्याचे माझी पक्की माहिती आहे."

केंद्रातले सरकार दुटप्पी आणि ढोंगी आहे. ऑनलाईन गेमिंग संदर्भात छत्तीसगडमधील अनेक विरोधी पक्षातील नेत्यांवर कारवाई झाली. काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल यांच्यावर कारवाई झाली. त्यांच्या चिरंजीवांना ईडीने अटक केली. अशाच प्रकारचे गुन्हे महाराष्ट्रातील सत्ताधारी आमदार करत आहेत. ऑनलाईन गेमिंगच्या व्यवहारात त्यांचाही सहभाग आहे. पण त्यांच्यावर ईडीने कोणतीही कारवाई केली नाही. छत्तीसगड, झारखंड दिल्लीतील लोकांवर जशी कारवाई केली, तशी महाराष्ट्रात होत नाही, अशी टीका संजय राऊत यांनी केली.

## पालकमंत्री कुणीही होवो, कुंभमेळ्याची जबाबदारी माझ्यावरच -महाजन

मुंबई, दि. २० प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १८ जानेवारीला पालकमंत्रीपदांची घोषणा केली होती. नाशिक जिल्ह्यासाठी भाजपचे गिरीश महाजन यांचे नाव जाहीर करण्यात आले होते. मात्र या नियुक्तीला शिंदे गटाच्या नेत्यांनी विरोध केल्याने अवघ्या एक दिवसातच नाशिकच्या पालकमंत्रिपदाच्या निर्णयाला स्थगिती देण्यात आली होती. आज सहा महिने होऊन देखील नाशिकच्या पालकमंत्रीपदाचा तिढा अद्याप सुटलेला नाही. नाशिकमधून कोण पालकमंत्री होणार? याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असता गिरीश महाजन यांनी मोठा दावा केलाय.

पुढील वर्षापासून नाशिकमध्ये सिंहस्थ कुंभमेळा पार पडणार आहे. या पार्श्वभूमीवर नाशिकच्या पालकमंत्रीपदासाठी भाजप आग्रही असल्याचे बोलले जात आहे. मंत्री गिरीश महाजन यांची कुंभमेळा मंत्री म्हणून नियुक्ती देखील करण्यात आली आहे. गिरीश महाजन यांच्या नेतृत्वाखाली कुंभमेळ्याची तयारी देखील सुरु आहे. तर दुसरीकडे शिंदे गटाचे दादा भुसे हे देखील नाशिकच्या पालकमंत्रीपदासाठी आग्रही आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसकडून माणिकराव कोकाटे आणि छगन भुजबळ हे देखील पालकमंत्रीपदाच्या रेसमध्ये आहेत. त्यामुळे अद्याप महायुतीत हा तिढा सुटलेला नाही.



नाशिकमध्ये कुंभमेळा असल्याने भरघोस निधी नाशिकसाठी येणार आहे. त्यामुळे नाशिकच्या पालकमंत्रीपदासाठी महायुतीतील तीनही पक्ष आग्रही असल्याचे बोलले जात आहे. त्यातच आता गिरीश महाजन यांनी माध्यमांशी बोलताना नाशिक पालकमंत्रीपदाचा निर्णय लवकरच होईल. मात्र, तो निर्णय काहीही असला तरी कुंभमेळ्याची जबाबदारी माझ्यावरच आहे, असे वक्तव्य केले आहे. त्यामुळे आता राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. आता गिरीश महाजन यांच्या वक्तव्यानंतर शिवसेना शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री काय भूमिका घेणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## क्रूझ अपघातात ३८ जणांचा मृत्यू

हा लाँग बे, दि. २० वृत्तसंस्था

व्हिएतनाममधील प्रसिद्ध हा लाँग बे येथे पर्यटकांना घेऊन जाणारी बोट उलटल्याने किमान ३८ लोकांचा मृत्यू झाला. अचानक आलेल्या जोरदार पावसामुळे ही दुर्घटना घडली. या दुर्घटनेत अनेक कुटुंबे होती आणि मृतांमध्ये २० हून अधिक मुलांचा समावेश आहे. बचाव पथकांनी ११ जणांना वाचवले असून बेपत्ता लोकांचा शोध सुरू आहे.



हा लाँग बे येथे पर्यटकांना घेऊन जाणारी बोट उलटल्याने मोठी दुर्घटना घडली. बोटीमध्ये ४८ प्रवासी आणि ५ क्रू मेंबर्स होते. यूनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळाजवळ ही घटना घडली. हनोई येथून अनेक कुटुंबे पर्यटनासाठी आली होती, ज्यात २० पेक्षा जास्त मुलांचा समावेश होता. सीमा सुरक्षा दलाच्या जवानांनी ११ लोकांना वाचवले आणि ३८ जणांचे मृतदेह बाहेर काढले. अजूनही ८ लोक बेपत्ता असून त्यांचा शोध सुरू आहे. अधिकाऱ्यांकडून दुर्घटनेच्या कारणांचा तपास सुरू आहे आणि बचावकार्य रात्रभर सुरू होते. पंतप्रधान फाम मिन्ह चिन्ह यांनी मृतांच्या कुटुंबियांबद्दल शोक व्यक्त केला आहे. त्यांनी संरक्षण आणि सार्वजनिक सुरक्षा मंत्रालयांना तातडीने शोध आणि बचाव कार्य करण्याचे आदेश दिले. "घटनेच्या कारणांची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई केली जाईल," असे सरकारकडून सांगण्यात आले आहे.

हा लाँग बे परिसरात राहणारे ट्रॅन ट्रोंग हंग यांनी सांगितले की, दुपारी २ च्या सुमारास अचानक हवामान बदलले. "आकाश काळे झाले... पायाच्या बोटाएवढ्या गारा, जोरदार पाऊस, वादळ आणि विजा कडाडत होत्या," असे ते म्हणाले. या वादळामुळे हनोई, थाई गुयेन आणि बॅक निन्ह या उत्तरी प्रांतांमध्ये जोरदार वारे आणि पाऊस झाला. हनोईमध्ये जोरदार वाऱ्यामुळे अनेक झाडे उन्मळून पडली.

## शक्तीपीठ महामार्ग गाडून दाखवणार - विनायक राऊत

कोल्हापूर, दि. २० प्रतिनिधी

देवा भाऊ म्हणतात शक्तिपीठ महामार्ग करून दाखवणार, पण आम्ही म्हणतो शक्तीपीठ महामार्ग गाडून दाखवणार. भुताटकी करणारा साताऱ्याचा गद्दार नगर विकास मंत्री कंत्राटदारांसाठी शक्तिपीठ महामार्ग आणतो, असा घणाघात शिवसेना ठाकरे गटाचे माजी खासदार विनायक राऊत यांनी कोल्हापूरमध्ये बोलताना केला.



कोल्हापूरमध्ये शिवसेना ठाकरे गटाचा निर्धार मेळावा पार पडल. या मेळाव्यामध्ये बोलताना विनायक राऊत यांनी शक्तीपीठ महामार्गाला कडाडून विरोध करणार असल्याचे स्पष्ट केले. राऊत म्हणाले की, माजलेल्या गद्दारांचा नि:पात करण्यासाठी आणि पुन्हा शिवसेनेचे सरकार येण्यासाठी अंबाबाईला साकडं आहे. त्यांनी सांगितले की लाडक्या बहिणींचा पंधराशे रुपयांवर आता यांचा डोळा आहे. त्यांना योजनेतून बाहेर ढकल जात असा आरोप त्यांनी केला. ते पुढे म्हणाले की उद्धव ठाकरे यांनी निवडणूक आयोगाबद्दल जे वक्तव्य केलं आहे ते सरकार खरं करून दाखवत आहे. आपल्याला हवं तसे प्रभाग करून निवडणूक जिंकण्याचा प्रयत्न ते करतील असा आरोप सुद्धा विनायक राऊत यांनी केला. राऊत यांनी राणे कुटुंबावर सुद्धा प्रहार केला. ते म्हणाले की हे आमच्या कोकणातील कोंबडी चोर उद्धव ठाकरेंवर बोलतो. मात्र भाजपने उद्धव ठाकरे यांच्यावर बोलण्यासाठी हे पाळलेले आहेत. दरम्यान त्यांनी सुनील तटकरेंच्या विधानाचा सुद्धा समाचार घेतला.

दोन राष्ट्रवादी एकत्र यायच्या असल्यास भाजपला विचारावं लागेल असं म्हणत असतील तर रायगडच्या भूमीतील लोक कसे काय बोलू शकतात असे विचारणा त्यांनी केली. कोल्हापूर महापालिकेत एक नगरसेवकाचा ५१ नगरसेवक करावे लागतील, असेही त्यांनी यावेळी सांगितले. दरम्यान, कोल्हापुरातील पक्षातील अंतर्गत वादावर राऊत यांनी भाष्य केले. ते म्हणाले की, इंगवले यांचे नेतृत्वात झालेला मेळावा मोठा झाला. कार्यकर्त्यांची काळजी घेणारा जिल्हाप्रमुख तुम्हाला लाभला आहे. दरम्यान संजय पवार यांच्या अनुपस्थितीवर सुद्धा त्यांनी भाष्य केले. ते म्हणाले की संजय पवार आम्हाला भेटून गेले. त्यांच्या जवळच्या नातेवाईकांचा दिवसाचा कार्यक्रम असल्याने ते गेल्याचे त्यांनी सांगितले.





## पुनर्वसनासाठी शेवा कोळीवड्यातील महिलांचा चौथ्यांदा जेएनपीएची जहाजे रोखण्याचा इशारा

### केंद्रीय मंत्र्यांनी आश्वासन देऊनही अंमलबजावणी नाही

**उरण :** कोळीवाडा ग्रामस्थांनी पुनर्वसनाच्या मागणीसाठी जानेवारी मध्ये जेएनपीए बंदरातील मालवाहू जहाजे बंद केल्यानंतर केंद्रीय बंदर मंत्री सरबानंद सोनोवाल यांनी कॅबिनेटची मंजूरी घेवून जेएनपीए कडून जमीन देण्याचे दिलेले आश्वासन पूर्ण केलेले नाही. ते पूर्ण करणार असल्याचे लेखी आश्वासन जेएनपीए अध्यक्षांच्या माध्यमातून मालमत्ता विभागाच्या व्यवस्थापका कडून दिले होते. याची जुलै उजाडला तरी अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे शेवा कोळीवाडा विस्थापित महिला संघटनेने येत्या स्वातंत्र्य दिनी चौथ्यांदा जेएनपीए चॅनल बंद आंदोलनाचा इशारा दिला आहे.जेएनपीए बंदराच्या उभारणीसाठी १९८५ ला शेवा कोळीवाडा गावाचे विस्थापन केले होते. या संपूर्ण गावाला वाळवीने पोखरले आहे. त्यामुळे येथील नागरिकांना धोकादायक घरात आपल्या कुटुंबासह जीवन जगावे लागत आहे. विस्थापित झाल्यानंतर आज पर्यंत चार पिढ्या आशा स्थितीत वास्तव्य करीत आहेत. यात धोकादायक निवाऱ्या सह विस्थापितांच्या रोजगाराचाही प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे. शेवा कोळीवाडा ग्रामस्थांच्या पुनर्वसनासह विविध समस्या, प्रश्न प्रलंबित असल्याने शेवा कोळीवाडा विस्थापित महिला संघटना करणार जेएनपीएचे बेमुदत चॅनेल बंद आंदोलन जाहीर केले आहे.कोळीवाडा गावाचे आधी पुनर्वसन करा त्यानंतरच बंदरांचा विस्तार करा अशी भूमिका घेत संतप्त ग्रामस्थांनी जेएनपीए समुद्र चॅनल रोखुन धरले होते. बंदराच्या समुद्री चॅनल परिसरात छोट्या मच्छीमार बोटी आडव्या टाकून हे आंदोलन सुरू केले होते. त्यामुळे सुरक्षा म्हणून बंदरात ये जा करणारी जहाजे बंद करण्यात आली होती. याचा परिणाम जागतिक स्तरावरील व्यापारावर झाल्याने याची दखल केंद्रीय बंदर मंत्री सारबनंद सोनेवाल व राज्याचे माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चर्चा करून जेएनपीए प्रशासनाकडून लेखी आश्वासन दिले होते.

जेएनपीटी बंदर उभारण्यासाठी हनुमान कोळीवाडा गावाची जमीन संपादन करून त्याचे उरण येथील बोरी येथे पुनर्वसन केले आहे. पुनर्वसन कायद्यानुसार १७ ऐवजी केवळ २ हेक्टर क्षेत्रातच २५६ कुटुंबाचे १९८५ साली पुनर्वसन करण्यात आले आहे. १९९२ ला हनुमान कोळीवाडा गावातील २५६ घरासह संपूर्ण गावाला वाळवीने पोखरले आहे. कमी भूखंडावर पुनर्वसन करण्यात आल्याने अनेक कुटूंब ही अशाही परिस्थितीत दाटीवाटीने वास्तव्य करीत आहेत.त्यामुळे १७ हेक्टर क्षेत्रावरचपुनर्वसन करण्याच्या मागणीसाठी मागील ४० वर्षांपासून संघर्ष सुरू आहे.या काळात आता पर्यंत ग्रामस्थ आणि व्यवस्थापन यांच्यात ५०० हून अधिक बैठका झाल्या मात्र हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांच्या पुनर्वसनाचा प्रश्न सुटला नसल्याने ग्रामस्थांनी खास करून महिलांनी आक्रमक होत जेएनपीए विरोधात संघर्षच सुरु केला आहे.जेएनपीएने गावाच्या पुनर्वसनासाठी विकासित १०.५० हेक्टर जमीन देण्याचे मान्य केले आहे.त्याच्या मंजूरीचा प्रस्ताव गेल्या दोन वर्षांपासून केंद्र सरकारकडे प्रलंबित आहे.

## करोनाच्या काळात औषध, पाणी चोरलेल्यांचा येत्या निवडणुकीत हिशोब चुकता करणार !



**नवी मुंबई :** नवी मुंबईत करोनाच्या काळात औषधे चोरली, पाणी चोरले, नागरीकांच्या सोयायुविधांचे भूखंड बिल्डरांच्या घशात घातले. त्यामुळे या सर्वांचा हिशोब आगामी काळात होणाऱ्या निवडणुकीत चुकता करणार असा गंभीर आरोप वनमंत्री गणेश नाईक यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर केला आहे. नवी मुंबईत आज गणेश नाईक यांना अधिकाऱ्यांची, माजी लोकप्रतिनिधी तसेच पदाधिकारी यांच्यासमवेत विविध समस्यांबाबत सिडको प्रदर्शनी केंद्रात बैठक घेतली होती. त्यावेळी नाईकांनी पुन्हा एकदा उपमुख्यमंत्री शिंदे यांच्यावर आरोप केले.मुंबईच्या हक्काचे बारवी धरणातून मिळणारे ४० एमएलडी पाणी न मिळाल्यानेच शहरामध्ये पाणीटंचाई निर्माण झाली. पाणी चोरांमुळे नवी मुंबई तहानलेली राहिली आहे असा आरोपही नाईकांनी केला. बैठकीला माजी खासदार डॉ. संजीव नाईक, महापालिकेचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे, माजी महापौर सागर नाईक, जयवंत सुतार, सुधाकर सोनवणे, नवी मुंबई भाजपा जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील, माजी अध्यक्ष रामचंद्र घरत, यांच्यासह विविध प्रभागातील लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि महापालिकेच्या विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. वनमंत्री गणेश नाईक यांनी सातत्याने उपमुख्यमंत्री शिंदे यांच्यावर आरोप केले आहेत.त्याची प्रचिती आजच्या बैठकीतही पाहायला मिळाली.नवी मुंबईमध्ये लोकप्रतिनिधी सभागृह नसल्याने नगरसेवकांना दोष देताच येत नाही. पाणीटंचाई हे पालिका प्रशासनाचे अपयश आहे. पालिका प्रशासन नगर विकास खात्याच्या अखत्यारीत येते.नवी मुंबई प्रकल्पग्रस्तांच्या जमिनीवर उभी राहीली. परंतू करोना काळात नवी मुंबईला सिडकोने मदत करण्याऐवजी मुंबई, ठाण्यात मदत केली. त्यामुळे नवी मुंबईतील हक्काचे पाणी चोरायचे आणि दुसरीकडे नवी मुंबईत पाणी नाही असा आरोप करायचा असा आरोप नाईकांनी शिंदे यांच्यावर केला आहे.

# 'एकनाथ शिंदे -उद्धव ठाकरेही एकत्र येऊ शकतात', शिवसेनेच्या मंत्र्याचे मोठे विधान



महासागर प्रतिनिधी

**मुंबई :** राजकारणात कुणीही कुणाचा कायमचा शत्रू किंवा मित्र नसतो', हे वाक्य महाराष्ट्राच्या राजकारणात प्रसिद्ध आहे. या वाक्याला साजेशी उदाहरणे मागच्या काही काळात राजकारणात घडलेली आहेत, घडत आहेत. आगामी मुंबई महानगरपालिकेचे पडघम वाजू लागताच योगायोगाने मराठीच्या मुद्द्यावर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्यातील अंतर कमी झाल्याचे दिसले. १८ वर्षांनंतर दोन्ही भाऊ एका विषयासाठी एकाच मंचावर आले. त्यांच्यात संभाव्य युती होईल, अशी चर्चा आहे. अशात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही विधिमंडळात बोलत असताना भाषणात राजकीय टोलेबाजी करत उद्धव ठाकरेंना सत्तेत येण्याचे आवाहन केले. आता शिवसेनेतील (शिंदे) नेते आणि राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनीही अशाच प्रकारचे भुवया उंचावणारे विधान केले आहे.राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक हे धाराशिवच्या दौऱ्यावर असताना त्यांनी टीव्ही ९ वृत्तवाहिनीशी संवाद साधत असताना सदर विधान केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आदित्य ठाकरे यांच्यात शनिवारी झालेल्या एका आकस्मिक भेटीबद्दल प्रताप सरनाईक यांना प्रश्न विचारण्यात आला होता. 'आमच्या भेटीच्या बातम्या बघून काही नेते गावाला निघून जातील', असे विधान आदित्य ठाकरे यांनी केले होते. आदित्य ठाकरेंच्या विधानावर बोलताना प्रताप सरनाईक म्हणाले, सर्वच राजकीय पक्षाचे नेते एकमेकांना भेटत असतात. त्यातून राजकीय अर्थ काढणे चुकीचे आहे. कालपरवा विधिमंडळात भाषण करत असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमोरच उद्धव ठाकरेंना सत्तेत येण्याचे आवाहन केले होते. '२०१९ पर्यंत आम्ही तरी विरोधात येऊ शकत नाही, पण तुमची इच्छा असेल तर तुम्ही याबाजूला (सत्ताधारी बाकावर) येऊ शकता', असे म्हटले होते, याची आठवण प्रताप सरनाईक यांनी करून दिली. तर उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदेंही एकत्र येतीलविधिमंडळात शेवटच्या दिवशी उद्धव ठाकरे यांनी एकनाथ शिंदेंच्या बाजूला बसायला नकार दिला होता. तसेच हे दोन नेते एकमेकांना नमस्कारही करत नाहीत, असा प्रश्न विचारला असता प्रताप सरनाईक म्हणाले की, आज जे चित्र दिसते, तेच उद्या असेल असे नाही. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांचेच पाहा. १९ वर्षांपूर्वी वेगळे झाल्यानंतर तेही एकमेकांकडे पाहत नव्हते. हसत नव्हते. आता ५ जुलै रोजी मात्र त्यांनी एकमेकांना आलिंगन दिले. यदा कदाचित भविष्यात हाच प्रसंग उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्याबाबतीतही होऊ शकतो. पण त्यासाठी वाट पाहावी लागेल. राजकारणात कुणीही कुणाचा शत्रू किंवा मित्र राहत नाही, या वाक्याचा उल्लेखही प्रताप सरनाईक यांनी केला. ते म्हणाले, मी आणि जितेंद्र आव्हाड बालमित्र आहोत. पण मागच्या नऊ वर्षांत आमच्यातून विस्तवही जात नव्हता. आमचे पटत नव्हते. पण शेवटी नऊ वर्षांनंतर काही ना काही निमित्ताने आम्ही पुन्हा एकत्र आलो.

## आमचे ऐकल्यास तुमचीच मते वाढतील, खासदार सुप्रिया सुळेंचा भाजपला सल्ला




महासागर प्रतिनिधी

**मुंबई :** 'आमच्या विचारांचे लोक संसदेत कमी झाले आहेत. परंतु या विचारांचे नागरिक जोपर्यंत देशात आहेत, तोपर्यंत संविधान राहणारच आणि देशात बदल घडणारच. माझा देशातील सर्वसामान्य जनतेवर विश्वास आहे. आज इमानदार लोकांमुळे देश चालला आहे. पूर्वीच्या काळात वैचारिक लढाई होती आणि वैचारिक लढाईत मतभेद झालेच पाहिजेत, पण मनभेद होता कामा नये. त्यावेळी सत्ताधारी व विरोधकांनी एकमेकांवर टोकाची टीका केली, पण टीकेकडे निखळ मनाने पाहिले. या गोष्टीलाच सशक्त लोकशाही म्हणतात. त्यामुळे आम्ही जेव्हा सत्ताधारी पक्षावर टीका करतो. तसेच एखाद्या विधेयकावर काही सांगतो. तेव्हा आमच्या चार गोष्टी ऐकून घेतल्या आणि बदल करीत अंमलबजावणी केली, तर विधेयक चांगले होऊन तुमचीच मते जास्त वाढणार आहेत', असा सल्ला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्ष व खासदार सुप्रिया सुळे यांनी भारतीय जनता पक्षाला दिला.आंबेडकरी चळवळीतील विचारवंत, अभ्यासक व वक्ते, माजी मंत्री आणि बहुजन शिक्षण संघाचे संस्थापक दादासाहेब रुपवते यांच्या २६ व्या स्मृतिदिनानिमित्त शनिवार, १९ जुलै रोजी नरिमन पॉईंट येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहात अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला सुप्रिया सुळे यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून मार्गदर्शन केले. तसेच उल्हास पवार, शिरिष चौधरी, दादासाहेब रुपवते यांची नात उत्कर्षा रूपवते आणि रूपवते कुटुंबियांसह विविध संस्थांचे प्रतिनिधी व मान्यवर उपस्थित होते. 'दादासाहेब रूपवते अभिवादन सभा' या कार्यक्रमाच्या व्यवस्थापनाची जबाबदारी बहुजन शिक्षण संघाचे कार्यकारी विश्वस्त ॲड. संघराज रुपवते आणि अध्यक्ष बी. आर. कदम यांनी सहकाऱ्यांसह सांभाळली होती.

'सर्व दिग्गजांच्या केवळ योगदानामुळे नाही, तर त्यांच्या त्यागामुळेही महाराष्ट्र उभा राहिला. तेव्हाची प्रतिष्ठा तुमचे घड्याळ, गाडी आणि घरावरून ठरत नव्हती. तुमची प्रतिष्ठा ही तुमच्या बुद्धिमत्तेवर होती. तो काळ महाराष्ट्राचा होता. पूर्वीच्या आणि आताच्या महाराष्ट्रात प्रचंड बदल झाला असून हे आपले दुर्दैव आहे. महाराष्ट्राच्या संस्कृतीत, मातीत व शैक्षणिक क्षेत्रात दादासाहेब रूपवते यांच्यासारख्या दिग्गजांचे मोठे योगदान आहे. हा वारसा पुढे नेण्यासाठी युवा पिढीने पुढे सरसावले पाहिजे, असे आवाहन सुप्रिया सुळे यांनी केले. तसेच 'हनी ट्रॅप'शी संबंधित बातम्या वाढत आहेत. यामध्ये मंत्र्यांचीही नावे येत आहेत. हे गलिच्छ संस्कार आम्ही महाराष्ट्रात खपवून घेणार नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चौकशी करावी आणि निर्णय घ्यावा. दररोज दूरचित्रवाणीवर महाराष्ट्राची लाज काढू नका, असेही सुप्रिया सुळे म्हणाल्या.

'दादासाहेब रूपवते बहुआयामी व्यक्तिमत्व होते आणि त्यांचे अनेक भाषांवर प्रभुत्व असण्यासह संघटनकौशल्य उत्तम होते. त्यांच्या सहवासातून प्रत्येक क्षणाला खूप काही शिकलो. तर महात्मा ज्योतिबा फुले, महात्मा गांधी, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदींनी मानवता, समता आणि लोकशाहीचा मूलमंत्र दिला.

## कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांसाठी 'एसटी'चे नियोजन



**पुणे :** दरवर्षीप्रमाणे गणेशोत्सवासाठी पुण्यातून कोकणात जाणाऱ्यांचे नियोजन सुरू झाले आहे. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) स्वारगेट आणि चिंचवड स्थानकातून कोकणातील सर्व बसचे आरक्षण दोन महिन्यांपूर्वीच संपले आहे. महामंडळाने नेहमीप्रमाणे यंदाही पुणे विभागातून सुमारे २५० ते ३०० अतिरिक्त 'एसटी' कोकणाच्या मार्गावर सोडण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांचा प्रवास आणखी सुलभ होणार आहे.गेल्या वर्षी पुणे विभागातून कोकणात एसटीच्या २५१ अतिरिक्त फेऱ्या झाल्या होत्या. 'एसटी' महामंडळाला ५९ लाख ७५ हजार रुपयांचे अतिरिक्त उत्पन्न मिळाले होते. यामध्ये स्वारगेट बस स्थानकातून १२४, तर चिंचवड स्थानकातून १२७ फेऱ्यांचा समावेश असून चिपळूण, दापोली, रत्नागिरी, खेड, देवरुख, मंडणगड, तिवरे, सिंधूदुर्ग, लांजा या मार्गावर गाड्या सोडण्यात आल्या होत्या. गणरायाच्या उत्सवासाठी कोकणात जाण्याची परंपरा असलेल्या हजारो भाविकांनी यंदाही आधीच नियोजन सुरू केले आहे. स्वारगेट व चिंचवड स्थानकांवरून कोकणातील विविध शहरांकडे जाणाऱ्या नियमित गाड्यांच्या जागा भरल्याने, अतिरिक्त गाड्यांची मागणी करण्यात येत आहे.

त्यानुसार महामंडळाने यावर्षी ही मागणी ओळखून २५० ते ३०० जादा गाड्या सोडण्याचे नियोजन केले आहे. याबरोबरच महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अपंग प्रवाशांसाठी सवलतीही लागू असणार आहेत. त्यामुळे अनेक प्रवाशांनी अतिरिक्त गाड्यांवर लक्ष केंद्रित केले आहे. महामंडळाच्या संकेतस्थळावर आणि मोबाईल ॲपवर या गाड्यांची माहिती उपलब्ध होणार आहे. विशेषत: प्रवाशांनी शक्यतो समूह आरक्षण किंवा आगाऊ आरक्षण करावे, जेणेकरून अतिरिक्त एसटी सोडण्याचे नियोजन करणे सोपे जाईल, असे आवाहन एसटी महामंडळाचे पुणे विभाग नियंत्रक अरूण सिया यांनी केले.

मुंबई-पुण्यातूनकोकणात जाताना मार्गावर घाट, तीव्र वळणाचे रस्ते आणि चढ-उतार असतात. पावसामुळे अनेकदा प्रवासात अडथळे येतात. एसटीमध्ये तांत्रिक बिघाड होतो.

त्यामुळे प्रवाशांना दीर्घ काळ ताटकळत बसावे लागते. त्यामुळे प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून प्रमुख मार्गांवर दुरुस्ती पथके तैनात करण्यात येणार आहे, तर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली बस स्थानके आणि थांब्यांवर २४ तास कर्मचारी सेवा उपलब्ध ठेवण्याचे आदेशही परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहे. त्यामुळे प्रवाशांचा प्रवास आणखी सुकर होणार आहे.

## पावसाने उघडीप दिल्याने पुण्यात फळभाज्यांची आवक वाढली



**पुणे :** पावसाने उघडीप दिल्यानंतर मार्केट यार्डातील घाऊक बाजारात फळभाज्यांची आवक वाढली. शेवगा, मटार, फ्लॉवर, घेवडा या फळभाज्यांच्या दरात पाच ते दहा टक्क्यांनी घट झाली. अन्य फळभाज्यांचे दर स्थिर असल्याची माहिती घाऊक बाजारातील व्यापाऱ्यांनी दिली.श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील घाऊक बाजारात रविवारी राज्य, तसेच परराज्यातून मिळून ९० ट्रक फळभाज्यांची आवक झाली. कर्नाटक, गुजरातमधून मिळून ४ ते ५ टेम्पो कोबी, आंध्र प्रदेश, तामिळनाडूतून मिळून ३ ते ४ टेम्पो शेवगा, कर्नाटक, गुजरात, उत्तर प्रदेशातून ७ ते ८ टेम्पो हिरवी मिरची, हिमाचल प्रदेशातून २ टेम्पो मटार, कर्नाटकातून ३ ते ४ टेम्पो घेवडा, आंध्र प्रदेश, कर्नाटकातून २ टेम्पो तोतापुरी कैरी, गुजरात आणि मध्य प्रदेशातून १० ते १२ टेम्पो लसूण अशी आवक झाली, अशी माहिती मार्केट यार्डातील ज्येष्ठ अडते विलास भुजबळ यांनी दिली. पुणे विभागातून सातारी आले ५५० ते ६०० गोणी, भेंडी ६ ते ७ टेम्पो, गवार ४ ते ५ टेम्पो, टोमॅटो ८ ते १० हजार पेटी, हिरवी मिरची ४ ते ५ टेम्पो, ढोबळी मिरची ८ ते १० टेम्पो, काकडी ७ टेम्पो, कोबी ४ ते ५ टेम्पो, फ्लॉवर १४ ते १५ टेम्पो, भुईमूग शेंग १०० ते १२५ गोणी, तांबडा भोपळा १० ते १२ टेम्पो, मटार ७०० ते ८०० गोणी, कांदा ५५ ते ६० ट्रक, तसेच इंदूर, आग्रा, स्थानिक भागातून ३० ते ३५ ट्रक बटाट्याची आवक झाली. मेथी, कांदापातीच्या दरात घटगेल्या आठवड्याच्या तुलनेत पालेभाज्यांची आवक वाढली. मेथी, शेपू, करडई, कांदापातीच्या दरात घट झाली. मुळे, पालकाच्या दरात पाच ते दहा टक्क्यांनी वाढ झाली, अशी माहिती तरकारी विभागातील व्यापाऱ्यांनी दिली. मार्केटयार्डातील तरकारी विभागात रविवारी कोथिंबिरीच्या दीड लाख जुडींची, तसेच मेथीच्या ८० हजार जुडींची आवक झाली.पालेभाज्यांचे शेकड्यातील दर पुढीलप्रमाणे - कोथिंबीर -५०० ते १०००, मेथी -५०० ते १०००, शेपू -४०० ते ७००, कांदापात -८०० ते १५००, चाकवत -४०० ते ६००, करडई -३०० ते ६००, पुदिना -५०० ते ६००, अंबाडी -३०० ते ६००, मुळे -८०० ते १५००, राजगिरा -३०० ते ७००, चुका -३०० ते ७००, चवळई -३०० ते ६००, पालक -१२०० ते १५००.

## आई, तु ताण घेऊ नको...



**नाशिक :** आई, तुला त्रास द्यायचा नाही. माझा शैक्षणिक खर्च खूप आहे. तु ताण नको घेऊ. तुझी माझ्यामुळे धावपळ होते, असे चिठ्ठीत नमूद करुन नाशिक पोलीस दलात अंमलदार असलेल्या महिला पोलीस कर्मचारीच्या मुलीने गळफास घेतला. ही मुलगी २० वर्षांची होती. तिने लिहिलेल्या चिठ्ठीने सर्वांना भावनाविवश केले.पंचवटीतील विडी कामगार नगरात पूजा डांबरे राहत होती. ती नुकतीच बारावी परीक्षा उत्तीर्ण झाली होती. पुढील शिक्षणासाठी तिने महाविद्यालयात प्रवेशही घेतला होता. महाविद्यालयीन शिक्षण नियमितपणे सुरु झाले असताना पूजाने आत्महत्येचे पाऊल उचलल्याने नातेवाईकांसह सहकारी पोलीस कर्मचारीही हेलावले आहेत. वडील विभक्त राहत असल्याने कुटूंबात दोघी मायलेकी एकमेकांच्या साथीने एका छोट्याशा घरात राहत होत्या. आई नाशिक पोलीस दलात अंमलदार आहे.

आई-वडिलांच्या नात्यात निर्माण झालेली दरी, घरची बिकट आर्थिक परिस्थिती, यामुळे पूजा नैराश्यात होती. आईची तिच्या शिक्षणासाठी होणारी ओढाताण पाहून ती वैतागली होती. संवेदनशील पूजाने कौटुंबिक स्थितीनुरूप जुळते घेतले होते. परंतु, ती कायम तणावात राहत असे. आई पोलीस अंमलदार असल्याने त्यांना नोकरीसह घरचीही परिस्थिती सांभाळावी लागत होती. पूजा ही आईवर जीवापाड प्रेम करत होती. आपल्यामुळे आईची होणारी तारांबळ नकोशी झाल्याने तिने गळफास घेतला. हा प्रकार अन्य लोकांच्या लक्षात आल्यावर त्यांनी याबाबत आडगाव पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी येत पंचनामा केला. आडगाव पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू अशी नोंद करण्यात आली.

नाशिक पोलीस दल कुटूंबातील दुसरी आत्महत्याकाही दिवसांपूर्वी नाशिकरोड परिसरातील उपनगर पोलीस ठाण्यातील हवालदार स्वप्नील गायकवाड (३५) यांनी कुटूंबातील ताणतणावाला कंटाळून आपल्या सात वर्षीय मुलगी भैरवी हिला गळफास देत आत्महत्या केली होती. या प्रकारानंतर पोलिसांवर असलेला कामाचा ताण, कामाच्या वेळा, कुटूंबातील सदस्यांशी हरवत चाललेला संवाद, आरोग्याच्या तक्रारी, असे सर्व मुद्दे चर्चेत आले होते.

# रेल्वेच्या डब्यात तयार केले रेस्टॉरंट

### वांद्रे स्थानकात 'रेल कोच रेस्टॉरंट' चे रामदास आठवले यांनी केले उद्घाटन




महासागर प्रतिनिधी

**मुंबई :** रेल्वे डब्यांचे आयुर्मान संपल्यानंतर हे डबे भंगारात विकले जात होते. परंतु, या डब्यात नाविन्यपूर्ण बदल करून, त्यात रेस्टॉरंट साकारण्यात आले आहे. पश्चिम रेल्वेवरील हेरिटेज स्थानक असलेल्या वांद्रे स्थानकात 'रेल कोच रेस्टॉरंट' उभे राहिले आहे.

वांद्रे स्थानक महोत्सवाचा भाग म्हणून पश्चिम रेल्वेच्या मुंबई सेंट्रल विभागाने शनिवारी वांद्रे रेल्वे स्थानकावर एक अनोखे 'रेल कोच रेस्टॉरंट' सुरू केले. याप्रसंगी केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले, माहिती तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी या 'रेल कोच रेस्टॉरंट' उद्घाटन केले.

आकर्षण केंद्रबिंदू ठरणारमुंबई फिरायला येणाऱ्या पर्यटकांसाठी आणि प्रवाशांना आलिशान वातावरण आणि स्वादिष्ट जेवणाचा अनुभव देण्यासाठी खास रेस्टॉरंट तयार केले आहे. हे रेस्टॉरंट आठवडायाचे सर्व दिवस २४ तास सुरू राहील. हे रेस्टॉरंट वातानुकूलित असून बसण्यासाठी उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे. त्यात शाकाहारी आणि मांसाहारी खाद्यपदार्थ मिळतील. त्यामुळे प्रवासी, पर्यटक आणि खवय्यांना आवडीनिवडींचे चमचमीत पदार्थ खाता येणार आहेत.

अशी जन्माला आली रेस्टॉरंटची संकल्पनामुंबई शहर आणि उपनगरांतील रेल्वे स्थानकात खाद्यपदार्थांची दुकाने असली तरी बसून खाद्यपदार्थांचा आस्वाद घेता येईल असे रेस्टॉरंट नव्हते. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय व्हायची.

प्रवाशांना रेल्वे हद्दीतच चांगल्या दर्जाचे रेस्टॉरंट व खाद्यपदार्थ उपलब्ध करून दिल्यास उत्पन्नही मिळेल, या उद्देशाने भारतीय रेल्वेने 'रेल कोच रेस्टॉरंट' ही संकल्पना सुरू केली आहे. नॉन फेअर रेव्हन्यू अंतर्गत भारतीय रेल्वेने 'रेल कोच रेस्टॉरंट'ची योजना सुचविली आहे. ज्या ठिकाणी प्रवाशांची संख्या जास्त असते, त्याठिकाणी रेस्टॉरंट उघडावे, अशा सूचना रेल्वे मंडळाकडून देण्यात आली आहे.

### पत्रिका पाहण्याच्या बहाण्याने तरुणीचा विनयभंग; सहकारनगर पोलिसांकडून ज्योतिषी अटकेत

**पुणे:** भावाच्या जन्म पत्रिकेवर तोडगा सांगण्याच्या बहाण्याने एका ज्योतिषाने तरुणीचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना सहकारनगर भागात घडली. आरोपी ज्योतिषीने वनस्पती देण्याची बतावणी करुन तरुणीला कार्यालयात बोलावले. त्याने कार्यालायत तरुणीचा विनयभंग केला. या प्रकरणी सहकारनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी ज्योतिषाला अटक करण्यात आली आहे.अखिलेश लक्ष्मण राजगुरू (वय ४५) असे अटक करण्यात आलेल्या ज्योतिषीचे नाव आहे. त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र नरबळी, अघोरी प्रथा प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका २३ वर्षीय तरुणीने सहकारनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पीडित तरुणीने तिच्या मोठ्या भावाची जन्मपत्रिका दाखवण्यासाठी आरोपी ज्योतिषीची भेट घेतली होती. त्या वेळी राजगुरू याने पत्रिका पाहून भावाच्या आयुष्यातील अडचणी दूर करण्यासाठी एका विशेष वनस्पतीची आवश्यकता असल्याची बतावणी केली होती.

# म्हाडा कोकण मंडळ सोडत २०२५




महासागर प्रतिनिधी

**मुंबई :** म्हाडाच्या कोकण मंडळाकडून ठाणे, कल्याण, नवी मुंबई, वसईसह अन्य ठिकाणच्या ५ हजार २८५ घरांसह ७७ भूखंडांच्या विक्रीसाठी सोडत जाहीर करण्यात आली आहे. त्यानुसार या सोडतीची नोंदणी, अर्जविक्री-स्वीकृतीसाठी सोमवार, १४ जुलैपासून सुरुवात झाली आहे. अर्जविक्री-स्वीकृतीस सुरुवात झाल्यापासून पहिल्या सहा दिवसात सोडतीला बरा प्रतिसाद मिळाला आहे. पहिल्या सहा दिवसात अनामत रक्कमेसह २ हजार ७७२ अर्ज सादर झाले आहेत.कोकण मंडळाकडून २०२५ साठीची पहिली सोडत जाहिर झाली आहे. या सोडतीत २० टक्के सर्वसमावेश योजनेतील ५६५ घरे,१५ टक्के एकात्मिक योजनेतील ३००२ घरे, म्हाडाच्या विखुरलेल्या योजनेतील १६७७ घरे आणि म्हाडा कोकण मंडळ गृहनिर्माण योजनेतील (५० टक्के परवडणार्या सदनिका)४१ घरे अशा एकूण ५ हजार २८५ घरांसह ७७ भूखंडांचा समावेश आहे. सोमवार, १४ जुलैपासून या सोडतीसाठीची नोंदणी, अर्जविक्री-स्वीकृतीलाम्हाडा उपाध्यक्ष संजीव जयस्वाल यांच्या हस्ते आरंभ करण्यात आला आहे. इच्छुकांना १४ ऑगस्टपर्यंत अनामत रक्कमेसह अर्ज भरता येणार आहेत. तर पात्र अर्जदारांची अंतिम यादी १ सप्टेंबरला प्रसिद्ध करण्यात येणार असून ३ सप्टेंबर सकाळी १० वाजता ठाण्यातील डॉ काशीनाथ घाणेकर नाट्यगृहात सोडतीचा निकाल जाहिर केला जाणार आहे. अर्जविक्री-स्वीकृतीला सुरुवात झाल्यापासून पहिल्या सहा दिवसात या सोडतीला बरा प्रतिसाद मिळाला आहे. रविवारी सकाळी १०.४५ वाजेपर्यंत ५ हजार २८५ घरांसह ७७ भूखंडांसाठी एकूण ८ हजार १८९ इच्छुकांनी अर्ज भरले आहेत. तर या ८ हजार १८९ अर्जदारांपैकी अनामत रक्कमेसह २ हजार ७७२ अर्जदारांनी अर्ज सादर केल्याची माहिती कोकण मंडळातील वरिष्ठ अधिकार्यांनी दिली.

पहिल्या सहा दिवसातील हा प्रतिसाद समाधानकारक असल्याचे म्हाडाचे म्हणणे आहे. कोकण मंडळातील म्हाडा विविध योजनेतील घरांना प्रतिसाद मिळत नसल्याने अंदाजे १३ हजार घरांची विक्री प्रथम येणार्यास प्रथम प्राधान्य योजनेअंतर्गत आणि बुक माय होम द्वारे सुरु आहे. इतक्या मोठ्या संख्येने घरे रिक्त असताना कोकण मंडळाने आता ५ हजार २८५ घरांसह ७७ भूखंडांसाठी सोडत काढली आहे. या सोडतीत खासगी विकासकांच्या प्रकल्पातील ५६५ घरांचा समावेश आहे. खासगी विकासकांच्या घरांना सोडतीत नेहमीच चांगला प्रतिसाद मिळतो. त्यामुळे यावेळीही या घरांना चांगला प्रतिसाद मिळण्याची शक्यता आहे. तर दुसरीकडे यावेळी कोकण मंडळाने आपल्या योजनेतील विखुरलेली १६७७ घरे समाविष्ट केली आहेत. ही घरे जूनी, विकली न गेलेली आहे. त्यामुळे या घरांना कसा प्रतिसाद मिळतो हे पाहणे महत्त्वाचे असणार आहे. दरम्यान विखुरलेल्या घरातीतील बाळकुम योजनेतील २८ घरांचा समावेश आहे. ज्या संकेत क्रमांकांतील ही घरे आहेत, त्या संकेत क्रमांकातील घरांची विक्री २०२३ मध्ये ५९ लाखांत करण्यात आली आहे. या घरांची मूळ किंमत २०१८ मध्ये ४३ लाख होती. पण आता २०२५ च्या सोडतीत ही घरे थेट ८४ लाखांत विकली जाणार आहेत. या घरांच्या किंमतीत भरमसाठ वाढ झाल्याने इच्छुकांमध्ये नाराजी आहे. तर दुसरीकडे चितळसर मानपा?ड्यातील घरांच्या किंमतीही ५१ ते ५२ लाख असून या किंमतीवरही इच्छुकांची नाराजी आहे. तेव्हा बाळकुम आणि चितळसर मानपाड्यातील घरांना कसा प्रतिसाद मिळतो हे १ सप्टेंबरला स्पष्ट होईल.

# गेलेला विकेंड तुपाशी, या विकेंडने ठेवले उपाशी!

## चिखलदरा नगरपालिकेचा पर्यटन कर निम्म्यावर | स्थानिक व्यावसायिकांचे मोठे नुकसान







**महासागर प्रतिनिधी**

*चुरणी, ( दि.20 )- चिखलदरा हे विदर्भातील थंड हवेचे ठिकाण म्हणून ओळखले जाणारे पर्यटनस्थळ, मागील आठवड्यात पर्यटकांनी गजबजून गेले होते. घाटातून वाहनांच्या गर्दीचा महापुर ओसंडून वाहत होता. स्थानिक व्यवसायिकांसाठीही हा विकेंड 'तुपाशी' ठरला होता. मात्र, याच आठवड्यात आलेल्या विकेंडने मात्र सगळ्यांनाच निराश ( उपाशी ) केले. या विकेंडला पर्यटकांची संख्या अत्यल्प असल्याने चिखलदरा नगरपालिकेचा पर्यटन कर निम्म्यावर आला असून स्थानिक व्यावसायिकही हिरमुसले आहेत.*

### स्थानिक पर्यटन विकासासाठी पावले उचलावीत

ही परिस्थिती पुढील आठवड्यांतही कायम राहिली, तर स्थानिक व्यवसायिकांच्या अर्थचक्रावर मोठा परिणाम होणार आहे. त्यामुळे शासन आणि पर्यटन विभागाने या भागातील पायाभूत सुविधा, स्वच्छता, वाहतूक व्यवस्था आणि प्रचार यावर लक्ष देणे आवश्यक आहे. चिखलदरा पर्यटन विकास आराखड्याला नव्याने गती देणे ही काळाची गरज आहे.

### वातावरणातील बदल कारणीभूत

पर्यटकांच्या संख्येत अचानक आलेल्या घसरणीमागे अनेक कारणे असू शकतात. काहींच्या मते पावसाची दांडी व गेल्या आठवड्यातील वाहतूकीची गर्दी, यामुळे पर्यटकांनी चिखलदराकडे पाठ फिरवली असावी. काही पर्यटकांनी स्थानिक सुविधांचा अभाव आणि स्वच्छतेच्या समस्येबद्दलही सोशल मीडियावर नाराजी व्यक्त केली होती.

### गेल्या आठवड्यात सात लाख, यंदा मात्र तीन लाख!

चिखलदरा नगरपालिकेला मागील विकेंडला तब्बल सात लाख रुपयांचा पर्यटन कर प्राप्त झाला होता. यामुळे प्रशासनासह व्यावसायिकांमध्येही समाधान व्यक्त करण्यात आले होते. मात्र, या आठवड्यात शुक्रवार, शनिवार आणि रविवार मिळून केवळ तीन लाख रुपयांच्या आसपास कर वसूल झाला आहे. नाका प्रमुख कुमार सामंत यांनी ही माहिती दिली. त्यांनी सांगितले की, पर्यटकांची संख्या घटल्यामुळे पर्यटन करात मोठी घसरण झाली असून ही बाब चिंतेची आहे.

### व्यावसायिकांच्या आशा उधळल्या

गेल्या आठवड्यात आलेल्या गर्दीचा अंदाज घेऊन हॉटेल, लॉज, खाद्यपदार्थ विक्रेते, खेळणी व मनोरंजन सुविधा असलेल्या व्यावसायिकांनी या विकेंडसाठी मोठ्या प्रमाणावर तयारी केली होती. परंतु, अपेक्षेप्रमाणे पर्यटक न आल्याने त्यांचा माल खपला नाही. परिणामी, मजुरी खर्चही वाया गेला असून आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणात झाले आहे. काही व्यावसायिकांनी कर्ज घेऊन साठा उभा केला होता, त्यांच्यासाठी ही परिस्थिती आणखी बिकट बनली आहे.

# भगतसिंग चौक देताहे अपघाताला आमंत्रण

## गजबजलेल्या चौकात खोल खड्डुयांचे साम्राज्य

### विद्यार्थी व नागरिक त्रस्त



**महासागर प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे, ( दि.20 )**–शहरातील सर्वात वर्दळीच्या भगतसिंग चौकाची अवस्था सध्या अतिशय बिकट झाली असून, तो नागरिकांच्या जिवावर बेतणारा धोकादायक रस्ता ठरत आहे. या चौकातील वळणावर खोल व मोठमोठे खड्डे निर्माण झाले असून, दररोज वाहनधारकांना आणि पादचारूयांना अपघाताच्या भीतीने प्रवास करावा लागत आहे.

या चौकाजवळच धामणगाव रेल्वे स्थानक व बसस्थानक असल्यामुळे विद्यार्थी, नोकरदार, व्यापारी आणि प्रवाशांची वर्दळ दिवसभर चालू असते. आजूबाजूच्या गावांमधून शिक्षणासाठी येणारे विद्यार्थी या मार्गावरून दररोज प्रवास करत असतात. त्यांना चिखल, खड्डे आणि गर्दीच्या समस्यांचा सामना करत जीव मुठीत धरून मार्ग काढावा लागतो.

### वाढले अपघाताचे प्रमाण

भगतसिंग चौक ते माहेश्वरी भवनपर्यंतचा सिमेंट रस्ता हा शहराच्या दोन भागांना जोडणारा मुख्य मार्ग आहे. याच मार्गावर प्रशासकीय कार्यालये असल्याने अधिकारी व सामान्य नागरिक यांची वर्दळ अधिक असते. मात्र, या रस्त्यावर असंख्य खड्डे पडल्यामुळे वाहतूक विस्कळीत होत असून, अपघाताची शक्यता सतत निर्माण होत आहे.

### प्रशासनाचे दुर्लक्ष, नागरिक संतप्त

स्थानिक नागरिकांनी अनेकदा प्रशासनाकडे तक्रार करूनही याकडे सतत दुर्लक्ष केले जात असल्याची भावना आहे. प्रशासन जर वेळेवर रस्ता दुरुस्त करत नसेल, तर एखाद्या अपघातासाठी जबाबदार कोण ?, असा संतप्त सवाल नागरिकांनी केला आहे.

### तातडीने उपाययोजनांची मागणी

या गंभीर समस्येकडे स्थानिक आमदार, नगरपरिषद प्रशासन व सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने लक्ष द्यावे, अशी नागरिकांची जोरदार मागणी आहे. अन्यथा वाढत्या अपघातांमुळे आणि नागरिकांच्या उद्रेकामुळे शहर प्रशासन अडचणीत सापडण्याची शक्यता आहे.

# उद्घाटनाच्या आधीच कोसळले तिकीट घराचे शेड!

## बडनेरा रेल्वे स्थानकावरील घटना



**महासागर प्रतिनिधी**

**बडनेरा,( दि.20 )**– बडनेरा रेल्वेस्थानकावर उद्घाटनाच्या आधीच स्थानकावर नव्याने उभारण्यात आलेल्या तिकीट घराच्या मुख्य प्रवेशदारासमोरील शेड शनिवारी सायंकाळच्या दरम्यान कोसळले आहे.

कामे सुरू असताना नव्याने बांधण्यात आलेल्या तिकीट आरक्षण कक्षाच्या छताचे पीओपी उद्घाटनाआधीच कोसळले आहे. अवघ्या 25 दिवसांपूर्वी लावण्यात आलेली पीओपी आता पावसाळ्यातल्या पाण्यापुढे टिकले नाही. अमृत महोत्सव दोन योजनेंतर्गत बडनेरा स्टेशनवर प्रवाशांसाठी अद्ययावत तिकीट आरक्षण कक्ष उभारण्यात येत आहे. हे काम अद्याप पूर्ण झाले नसतानाच छताचा काही भाग कोसळले. उद्घाटन झाले असते आणि तेव्हा ही दुर्घटना घडली असती, तर प्रवाशांना ईजा होण्याची शक्यता असती.

# महिलेच्या गळ्यातून मंगळसूत्र जबरीने हिसकले

## अच्युत महाराज मंदिराजवळील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.20 )**- वरुड शहरातील अच्युत महाराज यांच्या मंदिराजवळ एका महिलेच्या गळ्यातील 12 ग्रॅमचे सोन्याचे मंगळसूत्र अज्ञात चोरट्यांनी हिसकावून नेले. ही घटना 19 जुलै रोजी सायंकाळी 7 वाजताच्या सुमारास घडली. या प्रकरणी जयश्री केशवराव चौधरी (वय 60, रिंग रोड, वरुड) यांनी वरुड पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून दोन अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस सूत्रांनुसार, जयश्री चौधरी या गृहिणी असून त्या 19 जुलै रोजी सायंकाळी भाजीपाला आणण्यासाठी बाहेर पडल्या होत्या. भाजी घेऊन परतत असताना अच्युत महाराज मंदिराजवळ मोटारसायकलवर आलेल्या दोन अज्ञात तरुणांनी त्यांच्या गळ्यातील सुमारे 72 हजार रुपये किंमतीचे 12 ग्रॅम सोन्याचे मंगळसूत्र हिसकावून पलायन केले. या प्रकारानंतर जयश्री चौधरी यांनी तात्काळ पोलिसात धाव घेत तक्रार दाखल केली. पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली असून दोघा अज्ञात आरोपींच्या शोधासाठी तपास सुरू केला आहे.

# अंगणातील दोन वाहने पेटविली!

## सिद्धार्थ नगर परिसरातील मध्यरात्रीची घटना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.20 )**- गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सिद्धार्थ नगर परिसरात सिव्हिल लाईनमध्ये घरासमोर उभ्या असलेल्या दोन वाहनांना अज्ञात व्यक्तीने आग लावल्याची घटना 17 जुलै रोजी रात्री घडली. याप्रकरणी संजय उत्तम इंगोले (वय 52) यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी आदित्य वानखडे व अक्षय पाटील या दोन संशयितांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. इंगोले यांच्या तक्रारीनुसार, त्यांनी 17 जुलैच्या रात्री त्यांच्या घराच्या अंगणात एमएच 27 एजी 1033 व एमएच 27 सीजे 1236 या क्रमांकाचे दोन वाहने उभी केली होती. रात्रीच्या वेळी अचानक घराच्या अंगणातून धूर व आग नजरेस पडली. त्यांनी तत्काळ बाहेर धाव घेतली असता दोन्ही वाहनांना आग लागलेली होती. इंगोले व त्यांच्या कुटुंबीयांनी आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला, मात्र तोपर्यंत दोन्ही वाहने पूर्णत: जळून खाक झाली होती.

घटनेनंतर परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता त्यामध्ये संशयित आदित्य वानखडे व अक्षय पाटील दिसून आले. त्यानंतर इंगोले यांच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिसांनी दोघा संशयितांविरोधात गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली असून आग लावण्यामागचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

# 18.12 कोटींच्या निविदेसाठी अधिकाऱ्यांची धडपड?

## इतर कुणीही निविदा भरू नये, अधिकाऱ्यांचे फर्मान? | निविदा भरण्याचा आज शेवटचा दिवस




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 20 )**- अचलपूर कार्यकारी अभियंता, मध्यम व लघु पाटबंधारे विभागामार्फत मौजा पथ्रोट येथील खेकडा नाल्यावर पुरसंरक्षक बांधकामे करण्यासाठी 18,12,63,000 (अठरा कोटी, बारा लाख, त्रेसष्ट हजार) रुपयांची निविदा सूचना क्र. 03/2025-26 अंतर्गत एका वृत्तपत्रात प्रकाशित करण्यात आली आहे.

मात्र, हे कंत्राट एका विशिष्ट कंत्राटदारालाच जास्तीत जास्त रकमेच्या स्वरूपात मिळावे यासाठी विभागातील काही अधिकारूयांनी इतर कोणत्याही कंत्राटदारांनी ऑनलाईन निविदा भरू नये, असे मौखिक फर्मान नियमितपणे या विभागात काम करणाऱ्या कंत्राटदारांना दिले असल्याची माहिती मिळत आहे.

त्यामुळे आता सोमवार (दि. 21) शेवटच्या दिवशी इतर टेंडर येतात की, अधिकाऱ्यांचे ठरवलेले कंत्राटदारच यशस्वी होतात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

मेळघाट विधानसभा मतदारसंघात गेल्या अनेक वर्षांपासून पथ्रोटमधील खेकडा नाल्याच्या पाण्यामुळे गावाच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर होता. यासाठी पथ्रोटवासीयांनी तत्कालीन आमदार राजकुमार पटेल यांना साकडे घातले होते. त्यानंतर या नाल्याच्या पुरसंरक्षणासाठी भिंती, नाले व इतर कामांसाठी कोट्यवधींचा निधी मंजूर झाला आहे. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अंतर्गत उर्ध्ववर्धा सिंचन विभागाच्या मध्यम व लघु पाटबंधारे विभाग, अचलपूर यांच्यामार्फत 01/07/2025 रोजी एका वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध करून 18,12,63,000 रुपयांचे टेंडर काढण्यात आले आहे. जास्तीत जास्त कंत्राटदारांनी आपापले कमीत कमी दरपत्रक भरावे आणि शासनाचे काम कमी खर्चात व्हावे, हा यामागचा उद्देश होता. मात्र, या उद्देशालाच काही अधिकारी हरताळ फासायला निघालेत की काय, असा प्रश्न उपस्थित होतो आहे. त्यामुळे आता खेकडा नाल्याची 'मलाई' नेमकी कोण खातो ?, हे भविष्यात स्पष्ट होईल.

### आपले 'भांडे' आपणच वाजविण्याची भूमिका

अचलपूर विधानसभा मतदारसंघात सत्ताबदल झाल्यानंतर लोकप्रतिनिधींचा 'राजयोग' आणि अधिकारूयांचा 'राजभोग' सुरू झाला आहे. काही अभियंते अनेक कंत्राटदारांसोबत भागीदारी करून 'उ' चा 'म' आणि 'म' चा 'प' करण्यात गुंतले आहेत. कंत्राटदारांशी हातमिळवणी करून आपलेच 'भांडे' आपणच वाजवण्याची परिस्थिती शासकीय कामांमध्ये दिसत आहे. आता या निविदेत हे अधिकाऱ्यांचे 'भांडे' किती वाजते, हेही पाहावे लागेल.

# चक्रधर स्वामींनी मराठी भाषेला दिला 'देववाणी'चा दर्जा – आमदार सुलभा खोडके

## प्रबोधन व्याख्यानात केले प्रतिपादन



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.20 )**- चक्रधर स्वामींनी मराठी भाषेला केवळ व्यवहाराची नव्हे, तर धर्माच्या अभ्यासाची व प्रवचनाची भाषा बनवले. त्यांनी मराठी भाषेला 'देववाणी'चा दर्जा दिला आणि समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत अध्यात्माचे ज्ञान पोहोचवले, असे स्पष्ट प्रतिपादन आमदार सुलभा संजय खोडके यांनी केले.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, महानुभाव अध्यासन केंद्र व कर्तव्य मंगल कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पाच दिवसीय प्रबोधन व्याख्यान समारोपाच्या पहिल्या सत्रात त्या बोलत होत्या. चक्रधर स्वामी यांच्या कार्याचा उजाळा देत आमदार खोडके म्हणाल्या, महानुभाव पंथाने महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनावर मोठा प्रभाव टाकला आहे. जातिभेद, अस्पृश्यता यांसारख्या विषारी सामाजिक रुढींना विरोध करत चक्रधर स्वामींनी समतेचा संदेश दिला. त्यांनी 'पंचकृष्ण' व 'परब्रह्म' या संकल्पनांद्वारे भक्ती, तपस्या, ब्रह्मचर्य आणि अहिंसेला प्राधान्य दिले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. भैय्यासाहेब मेटकर होते. उपाध्य कुलाचार्य वर्धनस्थ बीडकर बाबा (रणाईचे), महंत शारंगधर शास्त्री महानुभाव, सिनेट सदस्य अमोल ठाकरे, प्रशांत महल्ले, सुभाषराव पावडे, सुशांत चर्जन, महानुभाव अध्यासन केंद्र प्रमुख डॉ. महंत सोनपेठकर यांची प्रमुख उपस्थिती होती. आमदार सुलभा खोडके यांनी व्याख्यानपूर्वी श्री चक्रधर स्वामी व श्रीकृष्ण यांच्या प्रतिमेचे पूजन व वंदन करून आराधना केली. त्यानंतर उपस्थित संत व विद्वानांचे आशीर्वाद घेत, आयोजकांकडून शाल, पुष्पगुच्छ व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांनी व्यसनमुक्त जीवन आणि अध्यात्मिक मार्ग स्वीकारण्याचे आवाहन करत तरुण पिढीला चक्रधर स्वामींच्या विचारधारेकडे वळण्याची गरज व्यक्त केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. संदीप जुनघरे यांनी केले. यशस्वी आयोजनासाठी सर्वज्ञ सेवा महिला मंडळ, पारायण मंडळ, ज्ञान प्रबोधन मंडळाचे सदस्य व कार्यकर्ते यांनी विशेष परिश्रम घेतले. राज्यभरातून आलेले महानुभाव पंथाचे अनेक अनुयायी, अभ्यासक व विचारवंत यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष : गोर-गरीब, गरजू रुग्णांसाठी संजिवनी

राज्यभरासह अमरावती विभागातील गरजू रुग्णांना अडचणींच्या प्रसंगी मदतीचा हात देत मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाने महत्वपूर्ण टप्पे गाठले आहेत. राज्यातील हजारो गरीब आणि गरजू रुग्णांना त्यांच्या दुर्धर आजारावर तातडीने उपचार होण्यासाठी अत्यंत आवश्यक आर्थिक मदत पुरवून या निधीने आरोग्य सेवेप्रती आपली बांधिलकी दर्शविली आहे. गत सहा महिन्यात म्हणजे १ जानेवारी ते ३० जून २०२५ या कालावधीत अमरावती विभागांतर्गत येणाऱ्या पाचही जिल्ह्यातील या कक्षाव्दारे ७६३ गरजू व पात्र रुग्णांना गंभीर व दुर्धर आजारावरील वैद्यकीय उपचारासाठी एकूण ६ कोटी ८२ लाख ९१ हजार रुपयांचे अर्थसहाय्य देण्यात आले, ज्यामुळे असंख्य जीव वाचले आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली, गोरगरीब आणि गरजू रुग्णांना दुर्धर आणि महागड्या शस्त्रक्रियांसाठी थेट आर्थिक मदत देण्यासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मदाय रुग्णालय मदत कक्ष महत्त्वाचे ठरले आहे. सहाय्यता निधी प्राप्त करण्याकरिता संबंधित रुग्णांच्या नातेवाईकांना मुंबई येथे अर्ज सादर करण्यासाठी जावे लागत असे, त्यात बऱ्याच अडचणीही येत असत. ही अडचण दूर करुन गोर-गरीब रुग्णांना त्यांच्या स्वजिल्ह्यातच हे अर्थसहाय्य उपलब्ध होण्याच्या उद्देशाने मुख्यमंत्र्यांच्या संकल्पनेतून राज्यातील सर्व जिल्ह्यांत जिल्हाधिकारी कार्यालयात हा कक्ष स्थापित करण्यात आला आहे. गरजूंना तसेच सामान्य जनतेला मार्गदर्शन व तत्काळ मदत उपलब्ध करुन देण्यासाठी डॉक्टराची नोडल ऑफीसर म्हणून या कक्षात नेमणूक करण्यात आली आहे. मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार, मदत कक्षाच्या कार्यालयात आलेला एकही रुग्ण मदतीविना वंचित राहू नये, या तत्त्वावर कक्षाचे काम सुरू आहे. याच प्रयत्नांमुळे अमरावती विभागातील अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलडाणा आणि वाशिम या पाचही जिल्हास्तरीय मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षातून उत्तम रुग्णसेवेचे कार्य सुरू असून अनेक रुग्णांना निधी वितरीत करण्यात आला आहे.

### जानेवारी ते जून २०२५ पर्यंत ६ कोटी ८२ लाख ९१ हजार रुपयांची मदत

अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यान्वित असलेल्या मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाव्दारे १ जानेवारी ते ३० जून २०२५ या कालावधीत अमरावती जिल्ह्यातील १७३ रुग्णांना १ कोटी ६९ लाख १५ हजार रुपयांचे अर्थसहाय्य वितरीत करण्यात आले. अकोला जिल्ह्यातील ४० रुग्णांना ३० लाख ३० हजार रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली. यवतमाळ जिल्ह्यातील ८६ रुग्णांना ७९ लाख ८२ हजार रुपयांचे अर्थसहाय्य देण्यात आले. बुलडाणा जिल्ह्यातील ३४८ रुग्णांना २ कोटी ८९ लाख ४ हजार रुपयांचे अर्थसहाय्य देण्यात आले. तर वाशिम जिल्ह्यातील ११६ रुग्णांना १ कोटी १४ लाख ६० हजार रुपयांची वैद्यकीय मदत वितरीत करण्यात आली आहे.

### असा आहे उपक्रम

महाराष्ट्रातील गरजू व पात्र रूग्णांना वैद्यकीय उपचाराकरिता आर्थिक मदतीचा हातभार लावण्याकरिता मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने सुरू केलेला हा लोकोपयोगी व महत्वाकांक्षी उपक्रम आहे.




### योजनेसाठी पात्रता व निकष

या उपक्रमाचा लाभ घेण्याकरिता अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा लागतो. अर्जदाराचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न १.६० लाखांच्या आत असणे आवश्यक आहे. रूग्णाकडे रेशन कार्ड व आधार कार्ड असणेही गरजेचे आहे. उपचार घेत असलेले रूग्णालय महाराष्ट्र राज्यामधील असणे आवश्यक असून रूग्णालयाची नोंद मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या प्रणालीमध्ये असणे आवश्यक असते.

### अर्थसहाय्य मिळू शकणारे आजार

या महत्वाकांक्षी उपक्रमांतर्गत काही ठराविक आजार चिन्हीत करण्यात आले आहे. यामध्ये कॉकलियर ईम्प्लांट/ अंतस्त कर्णरोपण शस्त्रक्रिया (वय २ ते ६ वर्षांपर्यंत), हृदय/ यकृत/ किडणी/ फुप्फुस/बोन मॅरो आणि हाताचे प्रत्यारोपण, कर्करोग/रस्ते अपघात/लहान बालकांची शस्त्रक्रिया/मेंदुरोग/ हृदयरोग आणि हिप रिप्लेसमेंट सर्जरी यासह डायलिसिस/ केमोथेरेपी/ रेडिएशन/नवजात शिशुंचे आजार/ गुडघ्याचे प्रत्यारोपण/भाजलेले रूग्ण/ अस्थीबंधन आणि विद्युत अपघात आदी आजारांचा समावेश होतो.

### योजनेच्या लाभासाठी आवश्यक कागदपत्रे

वैद्यकीय सहाय्यता मदत कक्षाकडून अर्थसहाय्य प्राप्त करण्याकरिता विहित नमुन्यातील अर्ज, वैद्यकीय खर्चाचे अंदाजपत्रकाची मूळप्रत, डॉक्टरांच्या सही व शिक्यासह (खाजगी रुग्णालय असल्यास जिल्हा शल्यचिकित्सक यांचेकडून प्रमाणीत करणे आवश्यक आहे), तहसिलदार कार्यालयाचा उत्पन्नाचा दाखला (रु. १ लाख ६० हजार पेक्षा कमी), रुग्णाचे आधार कार्ड (महाराष्ट्र राज्याचे)/नवजात बाळासाठी आईचे आधारकार्ड आवश्यक आहे, रुग्णाचे रेशन कार्ड (महाराष्ट्र राज्याचे), संबधीत आजाराचे रिपोर्ट (ईन्व्हेस्टिगेशन रिपोर्टस) असणे आवश्यक, रुग्णाचा पासपोर्ट फोटो, अवयव प्रत्यारोपण रुग्णांसाठी झेडटीसीसी/ शासकीय समितीची मान्यता आवश्यक आहे, रस्ते अपघात असल्यास एफआयआरची प्रत जोडणे आवश्यक आहे.

### असा करता येईल अर्ज

या उपक्रमांतर्गत अर्थसहाय्य प्राप्त मिळविण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मदाय रुग्णालय मदत कक्ष स्थापित करण्यात आले आहेत. विहीत नमुन्यात मुळ अर्ज, सर्व आवश्यक कागदपत्रांसह संबंधित जिल्ह्याच्या मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाकडे सादर करणे आवश्यक आहे. अर्जाचा नमुना https://cmrf.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

### लाभासाठी रूग्णालयाची अट

या उपक्रमाचा लाभ घेण्यासाठी रूगणालय हे नोंदणीकृत असणे गरजेचे असून संबंधित रूग्णालयाची नोंद मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या प्रणालीमध्ये असणे आवश्यक आहे. रूग्णालयामध्ये महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना/आयुष्यमान भारत योजना/धर्मदाय रूग्णालय/आरबीएसके इत्यादी योजना कार्यान्वीत असल्यास या योजनांमधून रूग्णाचा उपचार होणे बंधनकारक आहे व रूग्णाचा आजार या योजनेमध्ये बसत नसल्यास तसे प्रमाणपत्र खर्चाच्या अंदाजपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच रुणाला डिस्चार्ज होण्याच्या पूर्वी अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

### किती रकमेपर्यंत मिळू शकते मदत

रूग्णाच्या आजाराचे व उपचाराचे स्वरूप, इन्व्हेस्टीगेशन रिपोर्ट याचे अवलोकन करून कार्यकारिणी समिती नियमाप्रमाणे निर्णय घेत जास्तीत जास्त २ लाखांचे अर्थसहाय्य हृदय/ यकृत/ किडणी/ फुप्फुस आणि बोन मॅरो प्रत्यारोपणाकरिता करण्यात येते.

गरजू व गरीब नागरिकांना गंभीर, दुर्धर आजाराच्यावेळी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाव्दारे देण्यात येणारी मदत बहुमोलाची ठरत आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाकडून गरजू रुग्णांना वेळेत मदत मिळावी, यासाठी राज्यातील सर्व मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष प्रयत्नशील असतात, अशी माहिती मुंबई मंत्रालय येथील राज्यातील सर्व सहाय्यता कक्षाचे समन्वयक रामेश्वर नाईक यांनी दिली. संवेदनशील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनातून जिल्हास्तरावर सहाय्यता कक्ष उपलब्ध झाल्याने अनेक गोर-गरीब, गरजू रुग्णांना दिलासा मिळाला आहे. अधिकाधिक गरजूंपर्यंत हा लाभ पोहचावा या उद्देशाने मुख्यमंत्री कार्यालयही या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करीत आहे. कठीण प्रसंगी मुख्यमंत्री कार्यालय सर्वसामान्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे असल्याने, त्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून येत आहे.

**विजय राऊत**
**सहायक संचालक (माहिती)**
**विभागीय माहिती कार्यालय, अमरावती**

# विधानभवन परिसर म्हणजे राजकीय पुढाऱ्यांचे व कार्यकर्त्यांचे तमाशा केंद्र आहे का ?

राज्याचे विधानभवन म्हणजे कायदेमंडळाचे मंदिर व लोकप्रतिनिधीचे भवन या ठिकाणी राज्याच्या विकासाचे, गुन्हेगारांवर लगाम कसण्याचा निर्णय घेणे,मुलभूत प्रश्न, शेतकऱ्यांचे प्रश्न, बेरोजगारांचा प्रश्न, शैक्षणिक प्रश्न, महागाई इत्यादी अनेक महत्वपुर्ण बाबींवर चर्चा करण्याचे व निर्णय घेण्याचे ठिकाण म्हणजे संविधानाने बनवून दिलेले विधानभवन.अशा विधानभवन परिसरात जर राजकीय पुढाऱ्यांचे कार्यकर्ते किंवा राजकीय पुढारी गुंडागर्दी करीत असेल अशा विधानभवनाला किंवा त्या परिसराला काय नाव द्यावे हा मोठा प्रश्न राज्यासमोर व राज्याच्या १४ कोटी जनतेसमोर उपस्थित होतो.राज्याच्या विकासासाठी, शेतकऱ्यांच्या आत्महत्ये संदर्भात, महागाईच्या संदर्भात किंवा मुलभूत सुविधांच्या संदर्भात राजकीय पुढारी हातापायी करणार नाहीत किंवा आत्महत्याही करणार नाही.परंतु राजकीय वर्चस्वासाठी आणि स्वतःच्या स्वार्थासाठी राजकीय पुढारी व त्यांचे कार्यकर्ते हातापायी करतात व संविधान स्थळाला मलीन करण्याचे काम करतात हे स्वतंत्र भारताचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल.अशा अनेक घटना पुर्वी सुध्दा झाल्यात.काही दिवस अगोदर आमदार संजय गायकवाड यांनी विधानभवनाच्या कॅन्टीन मालकाला मारहाण केली त्याचे काय झाले काहीच नाही आणि काही होणार सुध्दा नाही.दिनांक १७ जुलै २०२५ ला विधानभवन परिसरात गोपीचंद पडळकर व जितेंद्र आव्हाड यांच्या कार्यकर्त्यांत हाणामारी झाली, घाणेरड्या भाषेत शिवीगाळ झाली,कायदेमंडळाच्या मंदिराला काळा डाग लावला ही बातमी मिडिया व वर्तमानपत्राच्या माध्यमातून राज्यासह संपूर्ण देशाच्या



कानाकोपऱ्यात हवेसारखी पसरली यामुळे राज्याची बदनामी सुध्दा झाली याचे दुःख राज्याच्या जनतेला आहे परंतु बेशरम राजकीय पुढाऱ्यांना आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना तर बिलकुलच नाही ही शोकांतिका आहे.या घृणास्पद घटनेचा राजकीय पुढाऱ्यांवर किंवा त्याच्या कार्यकर्त्यांवर काहीच परिणाम होणार नाही. कारण या संपूर्ण लोकांनी बेशरमीची संपूर्ण हद पार केली आहेत. सध्याच्या परिस्थितीत राजकीय पुढाऱ्यांनी व त्यांच्या कार्यकर्त्यांनी विधानभवन परिसराला गुंडांचा आखाडा बनविल्याचे स्पष्ट दिसून आले.कारण अशा लज्जास्पद घटना एकावर होतच आहे.परंतु सरकार कारवाईचे फक्त आश्वासन देऊन अशा घटनांवर पांघरूण घालण्याचे काम करीत आहेत. परंतु या गुंडगिरीवर ठोस अशी कोणतीही कारवाई होत नाही ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे. अशा घटनांमुळे न्यायव्यवस्थेत मोठी ठेच पोचते व अनेक अडचणी निर्माण होतात. त्यामुळे मुख्यत्वेकरून राजकीय पुढाऱ्यांनी व त्यांच्या कार्यकर्त्यांनी थोडीशी तरी लाज शरम ठेवली पाहिजे. विधिमंडळाच्या परिसरात जी घटना घडली ती अत्यंत दुर्दैवी आहे.त्यामुळे जितेंद्र आव्हाड व गोपीचंद पडळकर किंवा संजय गायकवाड यांच्यावर कारवाई अशी करावी की भविष्यात कोणताही आमदार असे घृणास्पद कृत्य करणार नाही.यासाठी एकच सजा आहे ती त्यांना संविधानिक पदावरून हटविणे व विधानभवन परिसरात हाणामारी करणाऱ्यां दोन्ही गटाच्या कार्यकर्त्यांना आजीवन कारावास व्हायला पाहिजे.कारण त्यांनी न्यायपालिकेची व संविधानाची पायमल्ली केली आहे.अशाप्रकारे योग्य कारवाई होत असेल तरच कायदा व सुव्यवस्था सुरळीत राहील आणि संविधानिक परिसरात अशा लज्जास्पद घटनांवर आळा बसेल.कारण राजकीय पुढाऱ्यांना व कार्यकर्त्यांना कुस्त्या खेळायच्या असेल व एकामेकांच्या छातीवर बसायचे असेल तर हे कृत्य बाहेर कुठेही करता येते तेथे करावे.कारण विधानभवन परिसरात म्हणजे कोणाच्या बापाची जागीर नसुन ते संविधानिक, कायदेमंदीर व अती संवेदनशील क्षेत्र आहे.याची जाणीव आजी-माजी आमदार, मंत्री व कार्यकर्ते यांनी लक्षात ठेवले पाहिजे.राजकिय पुढाऱ्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना एवढी मुभा दिली आहे की सर्वच पक्षांचे आमदार आपल्या कार्यकर्त्यांना घेऊन विधिमंडळात येतात.बऱ्याचदा आमदारांच्या कार्यकर्त्यांकडे पासही नसतात.परवाना नसतांना ते अनेक ठिकाणी फिरत असतात.विधिमंडळात त्यांचा मुक्त संचार असतो.आमदारांच्या कार्यकर्त्यांचे विधिमंडळात फोटोसेशन चालते.म्हणजे जणुकाय पीकणीकला आले की काय अशी परिस्थिती कार्यकर्त्यांची असते.या संपूर्ण घटनेची दखल घेऊन सरकारने व गृहमंत्रालयाने ताबडतोब अशा घृणास्पद कृत्यावर लगाम कसली पाहिजे अन्यथा अशा घटनांचा फायदा असामाजिक तत्वांचे लोक घेऊ शकतात व अनर्थ होऊ शकतो यालाही नाकारता येत नाही.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार) नागपूर.**
**मो.नं.९९२१६९०७७९**

# निसर्गाची अवकृपा

माणसांप्रमाणे निसर्ग देखील बदलला आहे असे वाक्य हल्ली सर्वांच्या तोंडी ऐकायला मिळते आणि ते खरेही आहे कारण सध्या निसर्गाच्या लहरीपणा वाढत चालला आहे निसर्गाचा लहरीपणाचा अभ्यास करणारे हवामान खातेही निसर्गापुढे हतबल ठरत आहे कारण हवामानासंबंधीचा अंदाज बांधणे त्यांनाही कठीण होत आहे. पुर्वी ज्याप्रमाणे हवामान होते तसे हवामान आता राहिले नाही. सध्या सतत हवामान बदलत असते. निसर्गाचा लहरीपणा वाढला आहे. उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा या तीन ऋतूत जसे हवामान होते तसे आता राहिले नाही. जून ते सप्टेंबर हे चार महिने पावसाचे असतात मात्र गेल्या काही वर्षात आपल्या देशात वर्षभर पाऊस पडतो असे म्हटले तर वावगे ठरणार नाही कारण वर्षभर कोठेना कोठे अवकाळी पाऊस, गारा तसेच चक्रीवादळे होतच असतात. पावसाळाच नाही तर उन्हाळा आणि हिवाळ्याचीही तीच गत आहे. उन्हाळ्यात तर तापमान ४० अंशाच्या पुढे जाते पूर्वी उन्हाळ्यात सरासरी तापमान ३५ ते ३८ अंशाच्या दरम्यान असायचे ते आता ४० अंशावर गेले आहेत. अलीकडे ऋतुमान बदलत आहे कोणत्याच ऋतूची सुरवात वेळेवर होत नाही उन्हाळा, पावसाळा, हिवाळा असे तिन्ही ऋतू उशिराच सुरू होतात. आता हेच पहा ना जून मध्ये येणारा पाऊस जुलै संपत आला तरी दडी मारतो आणि आला तर असा येतो की दोन दिवसात दोन दिवसांची सरासरी भरून काढतो. मात्र अशाप्रकारच्या पावसाची आपल्याला गरज नसते कारण या पावसाने आपले नुकसानच होते. निसर्गाच्या या अवकृपेचे संकट केवळ आपल्या देशातच नाही तर संपूर्ण जगावर आले आहे. अर्थात या बदलत्या हवामानाला आणि निसर्गाच्या लहरीपणास ग्लोबल वॉर्मिंगला जबाबदार धरले जात आहे. ग्लोबल वॉर्मिंगमुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे. ग्लोबल वॉर्मिंग म्हणजे पृथ्वीवरील तापमानात होणारी वाढ. जेंव्हा पृथ्वीवरील सरासरी तापमान वाढते तेंव्हा ग्लोबल वॉर्मिंगची समस्या उदभवते. ग्लोबल वॉर्मिंगची समस्या दिवसेंदिवस वाढत जाईल असा इशारा जागतिक हवामान खात्याने दिला आहे त्यामुळे यापुढे हवामानात बदल हे होतच राहणार आणि त्यामुळे निसर्गाचा लहिरपणा देखील वाढणार आणि तीच चिंतेची बाब आहे अर्थात हवामानातील बदल आणि त्यामुळे होणारी निसर्गाची अवकृपा ही केवळ ग्लोबल वॉर्मिंगमुळे होत आहे असे म्हणणे म्हणजे स्वतःच्या चुकीवर पांघरून घालण्यासारखे आहे. निसर्गातील बदलाला जितके ग्लोबल वॉर्मिंग जबाबदार आहेत तितकेच आपण म्हणजे मानव देखील जबाबदार आहोत. मानवाने निसर्गात हस्तक्षेप केला जंगलतोड करून सिमेंटची जंगले उभारली. बेसुमार वृक्षतोड केली. औद्योगिकरणाच्या नावाखाली कार्बन उत्सर्जन केले. वाहतुकीच्या नावाखाली प्रदूषण वाढवले. निसर्गावर अतिक्रमण करून निसर्गावर अन्याय केला. नदी नाल्यांचा मार्ग बदलला. या सर्व कारणांमुळे पृथ्वीवरील हवामान बदलत आहे. सजीवांना विशेषतः मानवाला जगण्यासाठी प्राणवायूची गरज असते. मात्र मानवाच्या चुकांमुळे स्वार्थामुळे हवेत घातक रसायनांचे आणि प्रदूषणाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. सतत होणाऱ्या जंगलतोडीमुळे जंगलाखालील एकूण क्षेत्र २० टक्क्यांपेक्षा खाली आले आहे त्याचा मोठा परिणाम हवामान बदलावर झाला आहे. हवामान बदलामुळे निसर्गाचा लहरीपणा वाढला आणि निसर्गाने आपल्यावर अवकृपा करण्यास सुरवात केली. भारत हा कृषिप्रधान देश असून भारतातील ७० टक्के नागरिक शेती आणि त्याला पूरक असणारे व्यवसाय करतात. निसर्गाच्या लहिरपणाचा सर्वाधिक फटका हा शेतकऱ्यांना बसत आहे. बदलत्या हवामानमुळे कोरडा दुष्काळ, ओला दुष्काळ, अवकाळी पाऊस, गारपीट, चक्री वादळे अशा नैसर्गिक आपत्तींना शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागत आहे त्यामुळे शेतकरी मेटाकुटीला आला आहे. यामुळे अनेकांनी शेती करणेच बंद केले आहे तरुण वर्गाने गाव सोडून थेट शहर गाठले आहे. परिणामी गावे ओसाड होत आहे तर शहरांची लोकसंख्या वाढत आहे. हवामान बदलाचा परिणाम मानवाच्या आरोग्यावर देखील होत आहे. हवामान बदलामुळे श्वसनाचे आणि इतरही आजार वाढत आहे. निसर्गाचा लहरीपणाचा परिणाम केवळ मानवावरच नाही तर पशु पक्षी आणि सजीवांवर देखील होत आहे एकूणच निसर्गाच्या लहरीपणाचा परिणाम संपूर्ण जीवसृष्टीवरच होत आहे. निसर्गाची जर अशीच अवकृपा राहिली तर त्याचा परिणाम केवळ आपल्यालाच नाही तर येणाऱ्या पिढीला देखील भोगावा लागेल म्हणून या बदलत्या हवामानाची आणि त्यामुळे होणाऱ्या निसर्गाच्या अवकृपेची मानवाने गंभीर दखल घ्यायला हवी. हवामान बदलामुळे होणारे गंभीर परिणाम लक्षात घेऊन मानवाने आतापासूनच सकारात्मक पावले उचलायला हवीत. निसर्गाच्या या अवकृपेच्या संकटाकडे जर मानवाने दुर्लक्ष केले तर भविष्यात त्याची मोठी किंमत केवळ आपल्यालाच नाही तर संपुर्ण जीवसृष्टीला चुकवावी लागेल.



**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड, जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# राज्याचे राजकारण 'मृत्यूशय्ये'वर !

७ महिन्यांपूर्वी मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची, तत्कालीन मंत्री धनंजय मुंढे यांचा डावा हात समजल्या जाणा-या वाल्मिक कराडच्या सांगण्यावरून त्याच्या ४/५ साथीदारांनी अत्यंत निर्घुणपणे हत्या केली. या दुर्दैवी घटनेने संपूर्ण राज्यात खळबळ तर उडालीच होती. पण, राजकारणी आणि गुन्हेगार यांचे कसे साटेलोटे असते, याचेही भयानक दर्शन घडले. महिनाभरापूर्वी ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी 'अजित पवार हे 'गोचिडा'सारखे अर्थमंत्रीपदाला चिकटून बसले आहेत; आणि ते ओबीसी संस्थांना पाहिजे तसा निधी देत नाहीत', असे वक्तव्य केले होते. या वक्तव्याने राष्ट्रवादीचे प्रवक्ते सुरज चव्हाण आणि आमदार अमोल मिटकरी प्रचंड संतापले. त्यांच्यात आरोप-प्रत्यारोपाचा चांगलाच 'कलगीतुरा' रंगला. पण, एकमेकांवर टीका करताना ते आपले संस्कार विसरले. (खरेतर अशा माणसांवर संस्कार झालेले असतात की नाही ? हाच मोठा प्रश्न आहे) एकमेकांना अरे-तुरेची भाषा तर वापरलीच. पण, ती वापरताना 'डुक्करतोंड्या' 'माकडतोंड्या' अशा खालच्या स्तराच्या 'उपमां'चा वापर करण्यात आला. एकमेकांची जाहीरपणे लाज, शरम, अक्कल, लायकी, औकात काढत, प्रत्येकाच्या 'खानदाना'चाही उध्दार करण्यात आला. वरतून एकमेकांना 'बघून घेण्याच्या' धमक्या दिल्या गेल्या. आठ-दहा दिवस त्यांनी जनतेचे चांगलेच मनोरंजन केले.

हा 'तमाशा' संपत नाही तोच, मनसेचे नेते प्रकाश महाजन आणि भाजपचे नारायण राणे यांच्यात जुंपली. यातही बघून घेण्याच्या धमक्या दिल्या गेल्या. नंतर पावसाळी अधिवेशन चालू असताना बुलढाण्याचे शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी, निकृष्ठ जेवण मिळाले म्हणून, कँटीन मधील एका कर्मचा-याला मारहाण केली. या अत्यंत लाजिरवाण्या घटनेने 'लोकप्रतिनिधी' या पदाचा अपमान तर झालाच. परंतु, महाराष्ट्राच्या अस्मितेची अब्रू संपूर्ण देशाच्या वेशीवर टांगली गेली. ही घटना विसरत नाही तोच, संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांचे तोंड काळे करून, अंगावर काळी शाई फेकण्यात आली. या बातमीची शाई वाळत नाही तोच, लोकशाहीचे हनन करणारा आणि घृणास्पदाचा कळस गाठणारा अतिशय संतापजनक प्रकार विधानसभेच्या प्रांगणात घडला. भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर आणि शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या समर्थकांत प्रचंड राडा झाला. विधानभवन हे मंदिर मानले जाते. येथे जनतेचे प्रश्न, समस्या सोडविण्यासाठी कायदे बनविले जातात. परंतु, कायदे बनविणा-यांनीच कायदा तोडत काल जो 'धुडगूस' घातला, त्यामुळे त्या मंदिराचे पावित्र्य तर नष्ट झालेच, पण प्रत्येक नागरिकाचीही मान शरमेने खाली झुकली असणार, हे मात्र नक्की.

या राड्याला पडळकर यांना जबाबदार धरले जात आहे. मात्र, सदर घटनेचे चित्रिकरण बघता सुरुवातीला आव्हाड यांच्या कार्यकर्त्याने (की गुंडाने ?) जयंत पाटील यांना 'साहेब, आज मी पडळकरला मारेल' असा इशारा दिला होता. त्यानंतर आव्हाड यांनी पडळकर यांना 'मंगळसूत्र चोर' असा उल्लेख करून डिवचले; आणि मग दोन्ही बाजूंकडील समर्थक एकमेकांना भिडले व राड्याला सुरुवात झाली. आधी डिवचायचे आणि नंतर आपण निर्दोष असल्याचा कांगावा करणा-या आव्हाडांची पार्श्वभूमी सा-या महाराष्ट्राला माहिती आहे. खरे तर, अशी घटना घडल्याचे हे पहिलेच उदाहरण नाही. २००९ मध्ये मनसेच्या आमदारांनी अबू आझमी यांना मारहाण केली होती. नुकत्याच पार पडलेल्या अधिवेशनात भास्कर जाधव यांनीही गोंधळ घातला होता. अलिकडे, अधिवेशन आणि गोंधळ हे जणू समिकरणच झाले आहे. सर्वात पोरकटपणाची गोष्ट म्हणजे, विधानभवनाच्या पाय-यांवर बसून सत्ताधा-यांना टोमणे मारणे, टाळ्या वाजवून आरडाओरड करणे, हे कोणते आंदोलन ? किव वाटली ती आदित्य ठाकरेची. विधान परिषदेच्या उपसभापती नीलमताई गो-हे यांची खिल्ली उडवून काय साध्य केले ? हाच का तुमचा 'फुकाचा' मराठी बाणा; आणि मराठी माणसावरचे 'पुतणा मावशीचे प्रेम' ? हे चित्र बघताना, कॉलेजमधील टारगट मुले एखाद्या चौकातील कट्ट्यावर बसून जो असभ्य टारगटपणा करतात, तसा भास होत होता.

सदर घटनेवरून असंख्य प्रश्न पडतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे इतक्या मोठ्या प्रमाणात गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले समर्थक आत जातातच कसे? आणि कोणाच्या कृपार्शिवादामुळे? विधानभवन परिसरात हाणामारी करण्याची यांची हिंमत होते कशी ? या घटनेमागील खरा सूत्रधार कोण? तसे बघितले तर, पडळकरांनी शरद पवार आणि परिवारावर टीका केली होती. मग, जितेंद्र आव्हाडांना राग येण्याचे कारण काय? शरद पवार यांनीच हा मोहरा पुढे केला की काय? अशीही शंका उपस्थित होते. मारहाण केल्यानंतर आव्हाड समर्थक नितीन देशमुख आणि पडळकर समर्थक सर्जेराव टकले यांना पोलिसांनी अटक केली. आव्हाडांनी पोलिस गाडीखाली झोपत पोलिसांना अटकाव केला. तर, रोहित पवार यांनी मध्यरात्री पोलिस स्टेशनला जाऊन एका पीएसआयला दमदाटी केली. विशेष म्हणजे, अटक झालेले दोघेही गुन्हेगार असून त्यांच्यावर वेगवेगळे गुन्हेही दाखल आहेत. गुन्हेगारांना मदत करण्यासाठी सरकारी कामात अडथळा आणल्याबद्दल आव्हाड आणि पवार यांच्यावर गुन्हे दाखल होतील का ?

एकीकडे संविधानाच्या गप्पा मारायच्या आणि दुसरीकडे ते पाळायचे नाही व त्याचा अनादर करायचा. यावरून या कारभा-यांना आपल्या राष्ट्र, राज्य आणि जनतेबद्दल किती प्रेम आणि आपुलकी आहे, हे दिसून येते. आजकाल एकमेकांचे व्हिडिओ, फोन संभाषण व्हायरल करायचे, घोटाळे बाहेर काढायचे आणि दिवसभर एकमेकांचा बाप काढत अगदी खालच्या शब्दात चिखलफेक करणे, हेच राजकारण झाले आहे. गाडून टाकेन, मारून टाकेन, कोथळा बाहेर काढील, बोटे छाटीन अशा धमक्या दिल्या जात आहे. या सूड आणि कुरघोडीच्या 'गलिच्छ' राजकारणाला 'मविआ'चे सरकार पडल्यानंतरच सुरुवात झाली, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. आणि याला हातभार लावत आहेत त्या आजच्या व्यावसायिक आणि अविश्वासार्ह वृत्तवाहिन्या व त्यांचे लाचार 'दांडकेधारी' पत्रकार(?). रोज सकाळी हे लाचार 'गलिच्छ' राजकारणाचा जनक समजल्या जाणा-या; आणि स्वतःला अतिविद्वान (?) समजणा-या 'विश्वप्रवक्त्या'ची गरळ घेतात. नंतर त्याची हेडलाईन बनवतात. मग दिवसभर हे असे असे म्हणाले, त्यावर तुमचे मत काय? मग तिसरा, चौथा असाच रटाळ कार्यक्रम दिवसभर चालत असतो; आणि यालाच हे पत्रकारिता मानतात. राजकारण गलिच्छ होण्यामागचे एकमेव आणि महत्त्वाचे कारण म्हणजे या गुन्हेगार प्रवृत्तीच्या घोटाळेबाज 'गुंडां'वर कोणतीच कारवाई होत नाही. म्हणून यांची भीड चेपली जाऊन ते दिवसेंदिवस 'मस्तवाल' होत चालले आहे.

मुख्यमंत्री फक्त 'गुन्ह्याची किंवा घोटाळ्याची चौकशी होऊन आरोपीस कडक शासन होईल' हाच ठेवणीतला डायलॉग मारून वेळ मारून नेतात. 'उच्चस्तरीय समिती', 'एसआयटी' यांच्या अहवालाचे काय होते ? हा संशोधनाचा विषय आहे. बच्चू कडू, माणिक कोकाटे यांच्या शिक्षेला स्थगिती का दिली गेली ? याचे कोणी उत्तर देईल का ?, असो.

आज ब-याच लोकप्रतिनिधींवर खंडणी, धमक्या, बलात्कार, अपहरण, खून असे अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. अनेक घोटाळेबाज 'महाशय' तब्येतीच्या कारणास्तव अनेक वर्षांपासून जामिनावर बाहेर मजा मारत आहेत. कायदा हा फक्त सर्वसामान्य माणसांसाठीच असतो. ज्या राज्याचा दस्तुरखुद्द मुख्यमंत्री आणि गृहमंत्रीच कायदा आणि अधिकारांचा गैरवापर करत 'कृष्णकृत्य' करतात, तेथे लोकप्रतिनिधी कसे मागे राहतील? आता मतदारांनी अत्यंत जागरूक राहणे गरजेचे आहे. मतदान करताना, कोणत्याही अमिषाला बळी न पडता, सुसंस्कृत, उच्चशिक्षित, प्रामाणिक आणि महत्त्वाचे म्हणजे गुन्हेगारी पार्श्वभूमी नसलेल्या उमेदवारालाच मतदान करावे. अन्यथा, 'कधीतरी लोकशाही होती' असे म्हणण्याची वेळ येईल.

ज्येष्ठ पत्रकार भाऊ तोरसेकर यांनी त्यांच्या एका 'व्हिडिओ'त सांगितले होते की, 'जोपर्यंत राज्यातील ३ मोठे नेते (नामोल्लेख करण्याची गरज नाही) राजकारणातून बाहेर जात नाही, तोपर्यंत राज्याचे राजकारण सुधारणार नाही'. याचा प्रत्यय येतोच आहे. म्हणून, आज दिवसेंदिवस 'सडत' चाललेले राजकारण बघता, 'राज्याचे राजकारण मृत्यू शय्येवर' आहे, असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही.

**प्रदीप व्ही. खोलमकर**
**नाशिक.**
**मोबाईल ८७६७५९२९८०**

## गणेशमूर्ती विक्री केंद्र उभारताना 'ही' बाब लक्षात घ्यावी !

श्री गणेश चतुर्थीला जेमतेम २ महिने शिल्लक राहिल्याने गणेशभक्तांच्या तयारीला सुरुवात झाली आहे. ज्यांच्या घरी दरवर्षी श्री गणेश विराजमान होतात त्यांच्या तयारीचा पहिला भाग असतो तो श्री गणेशमूर्ती ठरवण्याचा. त्यादृष्टीने श्री गणेशमूर्ती बनवणारी आणि तयार गणेशमूर्तींची विक्री करणारी विक्रीकेंद्रे शहारासारख्या ठिकाणी उभारली जाऊ लागली आहेत. ही विक्रीकेंद्रे उभारण्यासाठी मूर्तिकारांना आणि मूर्ती व्यवसायिकांना महापालिकेची परवानगी अनिवार्य असून पालिकेने निर्देशित केलेल्या नियमांचेही पालन करावे लागते. वाहतुकीस आणि रहदारीस अडथळा होणार नाही अशाच ठिकाणी ही विक्रीकेंद्रे उभारण्यास परवानगी मिळत असल्याने काही ठिकाणी रस्त्यांच्या कडेला केराच्या डब्यांजवळ किंवा नाल्यांवर ही विक्रीकेंद्रे उभारण्यास परवानगी दिली जाते. गणेशोत्सव हा श्रद्धेचा उत्सव असल्याने साक्षात श्रीगणेशच आपल्या घरी येणार आहेत या भावाने श्रद्धाळू त्याच्या स्वागताची आणि मुक्कामाची घरी सिद्धता करत असतो. आपल्या श्रद्धास्थानाला केराच्या डब्याजवळ किंवा नाल्यावर पाहून कोणत्याही गणेशभक्ताला वाईट तर वाटणारच. श्री गणेशाच्या पार्थिव मूर्तीमध्ये देवत्व हे प्राणप्रतिष्ठापनेनंतर येत असले, तरी गणेशमुर्त्या अशा निषिद्ध स्थळी ठेवणे हा श्रीगणेशाचा अवमानच आहे. त्यामुळे श्री गणेश मूर्तिकारांनी आणि मूर्तीव्यवसायिकांनी अशा अयोग्य ठिकाणी विक्रीकेंद्रे उभारू नयेत. तसेच पालिकेनेही परवानगी देताना या बाबीकडे विशेष लक्ष द्यावे.

**जगन घाणेकर,**
**घाटकोपर, मुंबई**

# गावकऱ्यांनी श्रमदानातून तयार केला तात्पुरता मार्ग

## चिलाटी ते कुही रस्त्याची दुरावस्था | प्रशासनाकडून दुर्लक्ष, गावकऱ्यांकडून पुढाकार

**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी,( दि.20 )** – देशाने विज्ञान, तंत्रज्ञान आणि विकासाच्या क्षेत्रात मोठी प्रगती केली असली, तरी अमरावती जिल्ह्यातील दुर्गम मेळघाट भागातील कुही गाव आजही मूलभूत सुविधांपासून वंचित आहे. विशेषत: चिलाटी ते कुही रस्त्याची दयनीय अवस्था ही स्थानिक प्रशासनाच्या उदासीनतेचे उदाहरण ठरते आहे. दरवर्षी पावसाळा सुरू होताच या रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य पसरते, ज्यामूळे या गावातील दळणवळणाची सुविधा पुर्णत: बंद होते. या कठीण परिस्थितीत गावकरूयांनी हातपाय गाळण्याऐवजी स्वत: पुढाकार घेत रस्ता सुधारण्याचे ठरवले. गावातील नागरिकांनी श्रमदानाच्या माध्यमातून चिखलमय रस्त्यावर मुरूम व दगड टाकत तात्पुरती सुधारणा केली. यामुळे सध्या दळणवळणासाठी थोडाफार दिलासा मिळत असला तरी पक्क्या रस्त्याची गरज अधिक तीव्रतेने जाणवते आहे.



### आरोग्य व शिक्षण सेवांना फटका

रस्त्याच्या अभावामुळे कुहीसारख्या आदिवासी गावातील नागरिकांना आरोग्य, शिक्षण आणि बाजारपेठांपर्यंत पोहोचणे अत्यंत अवघड बनले आहे. रुग्णालयात पोहोचण्यासाठी वेळेत वाहन मिळणे कठीण होते, तर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसानही होत आहे. या भागातील नागरिक अनेक वर्षांपासून पक्क्या रस्त्याची मागणी करत आहेत, मात्र अद्यापही ठोस कार्यवाही झालेली नाही. गावकरूयांची एकमुखी मागणी आहे की, शासनाने या भागाकडे गांभीर्याने लक्ष देऊन चिलाटी ते कुही पक्का रस्ता मंजूर करावा. अन्यथा पावसाळ्यातील हाल आणि दुर्गमतेचे चक्र असंच कायम राहील.

### श्रमदानातून सामाजिक एकतेचे उदाहरण

गावकऱ्यांनी एकत्र येऊन, कोणताही शासकीय निधी न घेता स्वखर्चातून आणि श्रमातून हा तात्पुरता रस्ता तयार केला. हा उपक्रम सामाजिक एकतेचे आणि जिद्दीचे प्रतीक ठरतो. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे आम्ही हताश झालो होतो. पण आमच्या लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत सगळ्यांच्या सुरक्षिततेसाठी काहीतरी करणे आवश्यक वाटले, असे सांगताना सामाजिक कार्यकर्ते नानकराम ठाकरे यांनी माहिती दिली.

# थकले रे डोळे : आता तरी मदत मिळणार का?

## अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्याचा सरकारला सवाल

**महासागर प्रतिनिधी**
**वरुड, ( दि.20 )** – थकले रे डोळे, आता तरी मदत मिळणार का? असा प्रश्न तालुक्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांनी सरकारला केला आहे.

मागील वर्षी ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात वरुड तालुक्यातील बेनोडा शहीद महसूल मंडळात झालेल्या भीषण अतिवृष्टीमुळे हजारो हेक्टरवरील उभ्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. सुपीक जमीन खरडून गेली, उभ्या पिकांची राखरांगोळी झाली आणि एकदोन दिवसात शेतकऱ्यांचे कष्ट आणि गुंतवणूक पाण्यात गेली. शासनाने तत्काळ पंचनामे करून मदतीचे आश्वासन दिले, मात्र प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या पदरात काहीच पडलेले नाही. शेतकऱ्यांचे डोळे आताही सरकारकडे लागून आहेत. मदतीचे आश्वासन केवळ फाइलपुरते न राहता प्रत्यक्षात पोहोचेल का, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.आता याला जवळपास एक वर्ष उलटले आहे. सरकार बदलले, नवे मंत्रिमंडळ स्थापन झाले, मात्र शेतकरूयांची अवस्था जैसे थेच आहे. लवकरच मदत मिळेल या आश्वासनाचे फक्त शब्द ऐकू येतात, पण हातात काही लागत नाही. प्रशासनाकडून कोट्यवधी रुपयांचे प्रस्ताव मंजूर झाल्याचे सांगितले जात आहे, मात्र प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या खात्यावर मदतीचा एक रुपयाही जमा झालेला नाही.



मदतीची वाट पाहत थकलेल्या काही शेतकऱ्यांनी कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय घेतला. या भीषण वास्तवाकडे शासन कुठपर्यंत दुर्लक्ष करणार.



**विलास पाटील, सामाजिक कार्यकर्ते.**


मुख्यमंत्री आणि मंत्र्यांनी डोळ्यांत डोळे घालून आमच्याशी तातडीच्या मदतीचं आश्वासन दिलं होतं. पण एक वर्ष उलटून गेलं तरी मदतीचा ठावठिकाणा नाही. आमची पिकं गेली, जमीन खरडली, संसार उद्ध्वस्त झाले. आता तरी सरकारने आमच्यावर दया दाखवावी.



**नितीन पेलागडे, नुकसानग्रस्त शेतकरी.**

# मोर्शी विभागात वीज खांब, वाहिन्या आणि रोहित्रे वेलीमुक्त

## सुरक्षित आणि अखंड वीज पुरवठ्यासाठी महावितरणची मोहीम



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि. 20 )**– पावसाळ्यात वीजखांब व रोहित्रांवर वाढणाऱ्या वेली आणि झाडाझुडपांमुळे वीजपुरवठा खंडित होण्याचा तसेच अपघात होण्याचा धोका वाढतो. त्यामुळे मोर्शी विभागाने 'वेलीमुक्त वीज यंत्रणा' मोहीम राबवत 593 वीज खांब आणि वाहिन्या व 142 रोहित्रांवरील वेली एका दिवसात काढून टाकल्या.

महावितरणचे मुख्य अभियंता अशोक साळुंके आणि अधीक्षक अभियंता दीपक देवहाते यांच्या मार्गदर्शनाखाली, कार्यकारी अभियंता विजयकुमार कासट यांच्या पुढाकाराने ही मोहीम काल (दि. 19 जुलै) राबविण्यात आली. कंत्राटी कर्मचारी आणि महावितरणच्या टीमने संयुक्तरीत्या ही कारवाई केली.

### उपविभागनिहाय वेलीमुक्त वीज यंत्रणा

मोर्शी उपविभाग-1: 83 उच्चदाब, 24 लघुदाब वाहिन्या आणि 21 रोहित्रे
मोर्शी उपविभाग-2: 35 उच्चदाब, 50 लघुदाब, 17 रोहित्र
चांदुरबाजार : 64 उच्चदाब, 55 लघुदाब, 32 रोहित्रे
वरूड-1 : 78 उच्चदाब, 36 लघुदाब, 13 रोहित्रे
वरूड-2: 42 उच्चदाब, 52 लघुदाब, 37 रोहित्रे
शेंदुरजना घाट : 33 उच्चदाब, 40 लघुदाब, 22 रोहित्रे

# जरूडात शेतकऱ्याची गळफास लावून आत्महत्या

**महासागर प्रतिनिधी**
**वरूड, ( दि.20 )** – सरकारच्या कर्जमाफीच्या घोषणांवर विश्वास ठेवत कर्जमुक्तीचे स्वप्न पाहणारूया दिनेश मंगल भुते (वय 50) या शेतकरी पुत्राने कर्जबाजारीपणामुळे रविवारी (दि. 19 जुलै) पहाटे आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. दिनेश यांच्या वडिलांचे नाव मंगल संपतराव भुते असून ते वृद्ध असून, शेती हा त्यांच्या कुटुंबाचा एकमेव उदरनिर्वाहाचा स्रोत होता. मात्र गेल्या काही वर्षांपासून सततच्या नापिकीने कुटुंबावर आर्थिक संकट ओढावले होते. त्यातच दिनेश यांच्यावर क्रांतीज्योती महिला सहकारी पतसंस्थेचे 2 लाख आणि स्टेट बँकेचे 2 लाख असे एकूण 4 लाख रुपयांचे कर्ज झाले होते. त्यातच आपल्या मुलीच्या 12 वी नंतरच्या उच्च शिक्षणाचा खर्च आणि मुलाच्या माध्यमिक शिक्षणासाठी त्यांनी उसनवारी करत शिक्षण सुरू ठेवले होते. शेतातून उत्पन्न न मिळाल्यामुळे त्यांनी मोलमजुरी करून वृद्ध आई-वडील, पत्नी, मुले आणि संपूर्ण कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्याचा प्रयत्न केला. पण सतत वाढणारूया आर्थिक विवंचनेमुळे ते तणावाखाली होते. कर्ज वसुलीच्या दबावामुळे आणि सततच्या नापिकीने त्रस्त होऊन दिनेश यांनी अखेर आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलले. त्यांच्या पश्चात वृद्ध आई-वडील, पत्नी, मुलगा, मुलगी आणि दोन भाऊ असा मोठा आप्त परिवार आहे.



# सि.ए. परीक्षा उत्तीर्ण वेदिका काळे हिचा गवळी समाजाच्या वतीने सत्कार



**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव बारी, ( दि.20 )**– वेदिका सुनिल काळे हिने पहिल्याच प्रयत्नात चार्टर्ड अकाउटंट परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण केल्याबद्दल लिंगायत गवळी समाजाच्या वतीने तिचा सत्कार करण्यात आला. या यशाबद्दल वेदिकाचे सर्वत्र कौतुक होत असून, तिच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छाही देण्यात आल्या. या कार्यक्रमाला युवा स्वाभिमान पार्टीच्या माजी पंचायत समिती सदस्या रश्मी घुले (मामी), गवळी समाज संघटनेचे उपजिल्हाध्यक्ष व युवा स्वाभिमान पार्टीचे तालुकाध्यक्ष अजय घुले (मामा), वीरशैव समाज संघटनेचे अध्यक्ष रविंद्र अनवाने, माजी कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक शेखर काळे, योगेश दूध डेअरीचे संचालक गजानन काळे, उपसरपंच बंडू यमगवळी, तसेच छगन डोहिजड, विजय ओडे, शरद घुले, किसन मिसाळ, राहुल धारस्कर, मंगेश घुले, कैलास यमगवळी, कार्तिक ठाकरे, अभिषेक परळकर यांच्यासह अनेक मान्यवर व समाजबांधव उपस्थित होते. वेदिकाने मिळवलेले हे यश ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणारे आहे, असे मत यावेळी उपस्थितांनी व्यक्त केले.

# विद्यार्थ्यांनी घेतला भारतीय लोकशाही प्रक्रियेचा अनुभव

## शिवाजी शाळेत पार पडली विद्यार्थी मंत्रिमंडळ निवडणूक



**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी,( दि.20 )** – भारतीय लोकशाही प्रक्रियेचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांना मिळावा, तसेच त्यांच्यात नेतृत्वगुण, जबाबदारीची जाणीव आणि निर्णयक्षमता निर्माण व्हावी या उद्देशाने शिवाजी उच्च माध्यमिक शाळा, मोर्शी येथे विद्यार्थी मंत्रिमंडळ निवडणूक पार पडली. ही निवडणूक पारदर्शक आणि लोकशाही मूल्यांवर आधारित असून, महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार राबविण्यात आली.

विद्यार्थ्यांना देशातील निवडणूक प्रक्रियेचा अनुभव मिळावा यासाठी निवडणूक संपूर्ण टप्प्यांनुसार पार पडली. या उपक्रमात मतदार यादी तयार करणे, निवडणूक जाहीर करणे, उमेदवारी अर्ज भरणे, प्रचार, चिन्ह वाटप, प्रतिज्ञापत्र सादर करणे, अर्ज मागे घेणे यासारख्या सर्व प्रक्रिया राबविण्यात आल्या. शेवटी बॅलेट पेपरच्या माध्यमातून मतदान घेऊन निवडणूक पार पडली. या निवडणुकीत मुख्यमंत्रीपदी राधा ढोमणे, उपमुख्यमंत्रीपदी गौरी अंबाडकर यांची निवड झाली. सर्व नव्याने निवडून आलेल्या सदस्यांना मुख्याध्यापक श्रीकांत देशमुख यांनी पद व गोपनीयतेची शपथ दिली. त्यांनी आपल्या जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पार पाडण्याची ग्वाही दिली. या संपूर्ण प्रक्रियेत मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून उपमुख्याध्यापक मिलिंद ढाकुलकर, तर सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अशोक चौधरी, राजेश मुंगसे आणि सौरभ राजस यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

# अहिल्यादेवी होळकर यांचा अपमान करणाऱ्यावर कठोर कारवाई करा!

## ठाणेदारांना दिले निवेदन



**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी,( दि.20 )** – पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्यावर फेसबुकवर अश्लील व अपमानास्पद टिप्पणी करणारूया सुनील गोपाळ उभे या विकृत मानसिकतेच्या व्यक्तीवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी अंजनगाव सुर्जी येथील नागरिकांनी ठाणेदारांना निवेदनाद्वारे केली.

या घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्रात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. समाजाच्या श्रद्धास्थानी असलेल्या अहिल्यादेवींचा अवमान करणाऱ्याला कठोर शिक्षा होणे गरजेचे आहे, असे नागरिकांनी म्हटले आहे. पोलिसांनी गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करून तत्काळ अटक करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. या वेळी अमोल घुरडे, दीपक ढोके, अशोकराव लव्हाळे, प्रभाकर मातकर, विशाल पंडित, आशिष घुरडे, दीपक नवलकर, सतीश नागे, रवींद्र बचे, प्रेमकुमार बोके, बंडू बचे, निलेश पातोंड, प्रवीण बोके यांच्यासह तालुक्यातील अनेक मान्यवर नागरिक उपस्थित होते.

# मेळघाटातील शौचालय पाण्याविना

## स्वच्छ भारत मिशनचे तीनतेरा ?



**महासागर प्रतिनिधी**
**परतवाडा ( दि.20 )** – जिल्हा प्रशासनाने मेळघाटामध्ये हागणदारीमुक्त अभियान राबवून कागदोपत्री यश दाखवले. वरिष्ठ अधिकारूयांच्या बैठकीत 'तयार' फाईल मांडून वाह वा मिळवली. पण प्रत्यक्षात काय परिस्थिती आहे, ते समजून घ्यायची वेळ आली आहे.

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत 2.10 लाख रुपये व स्थानिक ग्रामपंचायतीकडून 90 हजार रुपये, असा एकूण 3 लाख रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला. जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभाग व पंचायत समितीच्या देखरेखीखाली हे शौचालय बांधण्यात आले. महिला, पुरुष व दिव्यांगांसाठी स्वतंत्र शौचालये उभारण्यात आली. प्लंबिंग, टाईल्स, बेसिनसह संपूर्ण बांधकामही करण्यात आले. पण या सगळ्यात एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे पाण्याची टाकी बसवलीच नाही.

### साहेब, पाणी कोठून येणार ?

या शौचालयांना पाण्याची सोय नाही. मुख्य पाण्याची पाइपलाइनच शौचालयापर्यंत पोहोचलेली नाही. त्यामुळे शौचालय उभे राहिले, पण त्याचा वापर करता येत नाही. काही ठिकाणी नागरिकांनी त्याचा उपयोग जनावरांचे चारे ठेवण्यासाठी करायला सुरुवात केली आहे. दुसरीकडे दिव्यांग बांधवांसाठी बांधलेल्या शौचालयांमध्ये 'कमोड सीट' बसवलेलीच नाही. आता हे शौचालय दिव्यांगांसाठी कसे उपयोगी ठरणार, असा सवाल उपस्थित होतो आहे. ग्रामपंचायत सचिवांची या सगळ्याकडे डोळेझाक होत आहे, तर प्रशासनातील अधिकारी पाहणी करूनच देयक दिले असे सांगताहेत.

### टाकी पाहूनच पैसे दिले, मग ती टाकी गेली कुठे?

दूरध्वनीवर संपर्क साधल्यावर पाणीपुरवठा विभागाचे एक अधिकारी म्हणाले, टाकीसहित नवनिर्मित शौचालयांची पूर्ण पाहणी करूनच आम्ही कंत्राटदाराचे देयक दिले. मग प्रश्न असा आहे की, त्या अदृश्य टाक्यांना भानामती लागली का? की कागदोपत्री टाकी लावली आणि प्रत्यक्षात काहीच नाही?

### आराखडे तयार, पण पाण्याचा मागमूस नाही!

शासकीय योजना, निधी, अधिकारूयांचे दौरे आणि योजनेचे कागदोपत्री अहवाल सगळे काही बरोबर आहे, पण वास्तविक उपयोग मात्र शून्य. हे शिक्षित अधिकारूयांनी तयार केलेले आराखडे म्हणजे जनतेच्या डोळ्यात धूळफेकच. जर तुम्हाला या चमत्कारी शौचालयांचा अनुभव घ्यायचा असेल, तर एकदा मेळघाटात येऊन बघाच. येथे उघडी हागणदारी बंद करूया म्हणतात, आणि दुसरीकडे पाण्याच्या टाकीचे पैसे गिळतात, असे चित्र आहे.

# केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना श्रीक्षेत्र सावंगा येथे येण्याचे आमंत्रण

## श्री विठोबा संस्थान विश्वस्त मंडळाने घेतली भेट

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे, ( दि.20 )** – श्री विठोबा उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान, श्रीक्षेत्र सावंगा विठोबा येथील विश्वस्त मंडळाने नुकतीच केंद्रीय भूप्रवाह, परिवहन व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची नागपूर येथे सदिच्छा भेट घेतली. ही भेट भाजप अमरावती जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख यांच्या नेतृत्वाखाली सुसंवाद आणि सौहार्द वातावरणात पार पडली.

या भेटी दरम्यान संस्थानच्या अध्यात्मिक, सामाजिक आणि सेवाभावी उपक्रमांची माहिती गडकरी यांना सादर करण्यात आली. श्रीक्षेत्र सावंगा विठोबा येथे प्रत्यक्ष भेट देण्यासाठी औपचारिक निमंत्रणही त्यांना देण्यात आले. या प्रसंगी संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे, विश्वस्त लक्ष्मण राठोड, संस्थानचे व्यवस्थापक रवि कलाने, तसेच 'अवधूती नाम' प्रतिनिधी अनिल राऊत, विनोद निचत, दिलीप कुडमेथे, रघुनाथ राऊत, श्रीकांत तिवाळे आदी मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते. संस्थानाच्या कार्याबद्दल नितीन गडकरी यांनी समाधान व्यक्त केले व भविष्यात श्रीक्षेत्र सावंगा विठोबा येथे भेट देण्याचे आश्वासन दिले.



# कॅलिडोस्कोप

## वायुदलाची धावपट्टीच विकली!



चोर, चोरी, चोरीचे प्रताप आणि तत्सम अनेक घटना आजवर प्रत्यक्षात घडल्या आहेत आणि काही घटना तर चित्रपटांतूनही अनेकांनी पाहिल्या आहेत. फसवाफसवीचे हे प्रकार कायमच चर्चेचा विषय ठरत असताना आता त्यात आणखी एका भयंकर प्रकरणाची भर पडली आहे.

पंजाबच्या फिरोजपूरमधील हा प्रकार असून, तिथे एका माय-लेकाच्या जोडीने घर, शेतशिवार नव्हे, तर चक्क अशी वस्तू विकली आहे, जी पाहून भल्याभल्यांना घामच फुटला. उपलब्ध माहितीनुसार या आई आणि मुलाने वायुदलाची ऐतिहासिक धावपट्टीच विकली. याच धावपट्टीवर १९६२, १९६५ आणि १९७१ च्या युद्धांच्या वेळी भारतीय वायुदलाची विमाने उतरली होती. २८ वर्षांपूर्वीच्या या कारनाम्याचा उलगडा नुकताच झाला असून उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर या मायलेकाच्या जोडीविरोधात विविध कलमांअंतर्गत फिर्याद दाखल करण्यात आली.

एका तक्रारीनंतर हे संपूर्ण प्रकरण उघडकीस आले. निशान सिंह यांनी 'पंजाब व्हिजीलन्स ब्यूरो'च्या अध्यक्षांना उद्देशून एक पत्र लिहून तपास करण्याची मागणी केली. दुमनी गावातील उषा अंसल आणि तिचा मुलगा नवीनचंद अंसल याने काही अधिकाऱ्यांच्या साथीने पद्धतीने भूखंडावर मालकी हक्क सांगत त्याची विक्री कशी केली हे त्यांनी दाखवून दिले. प्राथमिक स्वरुपात तक्रार करूनही तपास झाला नाही, असे कळताच निशान सिंग यांनी पंजाब- हरियाणा न्यायालयात याचिका दाखल केली आणि न्यायालयाने या प्रकरणाचा तपास करण्याचे आदेश दिले. तपासातून समोर आलेल्या माहितीनुसार भारत आणि पाकिस्तान सीमेनजीक फत्तुवाला गावात ही हवाई पट्टी असून १२ मार्च १९४५ मध्ये ब्रिटीश शासनाने दुसऱ्या महायुद्धादरम्यान 'रॉयल एअरफोर्स'साठी ती अधिग्रहित केली होती. पुढे हीच धावपट्टी भारतीय वायुसेनेच्या ताब्यात आली आणि तीन युद्धांमध्ये तिचा वापर करण्यात आला. बहुतांशी लँडिंग ग्राऊंड म्हणून तिचा वापर झाला होता.

या प्रकरणाच्या मुळाशी पोहोचण्याचा प्रयत्न झाला तेव्हा उषा अंसल आणि नवीनचंद अंसल याने काही अधिकाऱ्यांच्या मदतीने हेराफेरी करत आपणच या जमिनीचे मालक असल्याचे भासवले आणि ती १९९७ मध्ये ती विकून टाकली. मदन मोहन लाल नामक व्यक्ती या जमिनीचे मूळ मालक असून त्यांचा मृत्यू १९९१ मध्ये झालेला असतानाही १९९७ मध्ये त्यांच्याच नावे बनावट कागदपत्र तयार करण्यात आले. न्यायालयीन हस्तक्षेप आणि कठोर ताशेऱ्यानंतर अखेर मे २०२५ मध्ये ही जमीन औपचारिक स्वरुपात पुन्हा एकदा संरक्षण मंत्रालयाकडे सोपवण्यात आली.

## प्रबोधन, केबीसी स्टाईल!




केबीसी म्हणजेच 'कौन बनेगा करोडपती' हा शो लागतो तेव्हा त्याचे चाहते टीव्ही स्क्रीनसमोरून हलत नाहीत. अमिताभ बच्चन हॉट सीटवर बसलेल्या स्पर्धकाला प्रश्न विचारतात आणि नंतर त्या प्रश्नासाठी ४ पर्याय देतात तेव्हा प्रेक्षकही योग्य उत्तर शोधण्यासाठी विचार करू लागतात. अलिकडेच दिल्लीतील एका ऑटो रिक्षाचा फोटो व्हायरल झाला आहे. या ऑटोच्या मागे केबीसीसारखेच ४ पर्याय दिले आहेत. उत्तरे प्रश्नाइतकीच मनोरंजक आहेत. ती वाचून तुम्हाला हसायलाही येईल आणि आश्चर्यही वाटेल.

सोशल मीडिया प्लॅटफॉर्म रेडिटवर एक ग्रुप आहे. त्यात लोक दिल्लीशी संबंधित मजेदार पोस्ट शेअर करतात. काही दिवसांपूर्वी एका यूजरने रिक्षाचा फोटो पोस्ट केला होता. ऑटो रिक्षाचा पूर्ण नंबर दिसत नसला तरी तो दिल्लीचा असल्याचे स्पष्ट दिसते. व्हायरल फोटोमध्ये ऑटो रिक्षाचा मागचा भाग दिसतो. त्यावर एक प्रश्न लिहीला आहे. ट्रॅफिकमध्ये हॉर्न वाजवल्यावर काय होते? यानंतर ४ पर्यायदेखील दिले आहेत अ) सिग्नल लवकर हिरवा होतो ब) रस्ता रुंद होतो क) गाडी उडू लागते ड) काहीही नाही. त्या व्यक्तीने ट्रॅफिक सिग्नल लाल असताना किंवा जॅम असतानाही हॉर्न वाजवणाऱ्या लोकांना असा टोमणा मारला आहे.

## फॉलोअर्स वाढवा, मोफत जेवा


ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी रेस्टॉरंट मालक वेगवेगळ्या युक्त्या लढवतात. कोणी सवलती जाहीर करतं तर कोणी काही वस्तू दिल्यावर एखादा पदार्थ मोफत खिलवतात. पण इटलीतलं एक




रेस्टॉरंट अनोखं आहे. इथे येऊन रेस्टॉरंटचे फोटो इंस्टाग्रामवर अपलोड करणाऱ्या ग्राहकांना मोफत जेवण दिलं जातं. सोशल मीडिया हे सध्याच्या काळातलं प्रसिद्धीचं सर्वात प्रभावी माध्यम आहे.

याच माध्यमाचा वापर करून या रेस्टॉरंटला प्रसिद्धी मिळवायची आहे. हे रेस्टॉरंट इटलीतल्या मिलान शहरात आहे. 'धीस इज नॉट अ सुशी बार' असं या रेस्टॉरंटचं नाव आहे. हे जपानी रेस्टॉरंट आहे. या रेस्टॉरंटमध्ये मोफत जेवण्याआधी इथे एखादी डिश ऑर्डर करावी लागेल. मग या डिशचा फोटो काढून 'धीस इज नॉट अ सुशी बार' या हॅशटॅगअंतर्गत पोस्ट करावा लागतो. मग युजर्सच्या फॉलोअर्सच्या संख्येनुसार मोफत जेवण देण्याचा निर्णय घेतला जातो. एक ते पाच हजार फॉलोअर्स असणाऱ्यांना एक प्लेट सुशी किंवा साशिमी मोफत दिलं जातं. पाच ते दहा हजार फॉलोअर्स असतील तर दोन प्लेट जेवण मोफत दिलं जातं. इन्स्टाग्रामवर फॉलोअर्स वाढवले तर तुम्हाला मोफत जेवण मिळू शकतं, असा हा फंडा आहे.

## छोट्याशा खोलीचे भाडे लाखात !



लंडनच्या पॉश केन्सिंग्टन भागात राजघराण्यातील मंडळी आणि अब्जाधीश राहतात. येथे ४७ वर्षीय सीझर मेंडेझ गेल्या चार वर्षांपासून ११.७ चौरस मीटरच्या एका छोट्या फ्लॅटमध्ये राहत आहे. हे घर इतके लहान आहे, की ते एखाद्या 'वॉर्डरोब' एवढेचच आहे. असे असूनही, सीझर या घराच्या भाड्यापोटी लाखो रुपये खर्च करत आहेत. एकेकाळी ती एका चौकीदाराची खोली होती. ती आता एका फ्लॅटमध्ये रूपांतरित झाली आहे.

त्याचे मासिक भाडे १,४०० पौंड (म्हणजे सुमारे १.५ लाख रुपये) आहे. हा फ्लॅट श्रीमंतांच्या परिसरात असल्याने त्याची किंमत २,५०,००० पौंड (म्हणजे सुमारे २.७ कोटी) असल्याचा अंदाज आहे. स्पेनमधील टेनेरिफ येथून आलेले सीझर म्हणतात, या छोट्या घरापासून 'नॅचरल हिस्ट्री म्युझियम' खूप जवळ आहे, तर 'हाइड पार्क' फक्त पाच मिनिटांच्या अंतरावर आहे. इतकेच नाही तर सीझर अनेकदा राजघराण्यातील सदस्यांना त्याच्या खिडक्यांमधून जाताना पाहतात. ते म्हणतात, मी प्रिन्स चार्ल्स, प्रिन्स विल्यम आणि क्वीन कॅमिला यांचा काफिला अनेक वेळा पाहिला आहे. हे सर्व पाहून इथे राहण्याचा माझा निर्णय अगदी बरोबर आहे, असे वाटते.

सीझर म्हणतात, लहान जागेमुळे इथे सर्वकाही व्यवस्थित ठेवावे लागते. ते गमतीने म्हणतात, माझी मैत्रीण असती तर कदाचित आमचा वेळ भांडण्यात गेला असता. कारण एक छोटीशी जागाही स्वच्छ नसती तर तिचं मन नक्कीच अस्वस्थ झालं असतं. हे घर आता विकले जाणार अहे, पण आपल्याला अजूनही इथेच राहता येईल, अशी सीझरला आशा आहे. ते म्हणतात, हे घर लहान आहे. पण आपल्यासाठी अगदी परिपूर्ण आहे. घरमालक निक मिन्स म्हणतात, एका खरेदीदाराने या घराच्या खरेदीत रस दाखवला आहे.

## गाव बनलं अस्वलांचा अड्डा



हवामान बदल, बेसुमार जंगलतोड यांचे परिणाम आता दिसू लागले आहेत. जंगलांलगत शहरं उभारल्यामुळे रानटी पशू मानवी वस्तीत येऊ लागले आहेत. अशीच एक घटना रशियामध्ये घडली. रशियातल्या बर्फाच्छादित चुकोटका या गावात ध्रुवीय अस्वलं घुसली आहेत. जवळपास ५६ ध्रुवीय अस्वलांनी या गावात आसरा घेतला आहे. यामुळे गावातले सात हजार लोक घरांमध्ये बंदिस्त झाले आहेत. अस्वलांच्या हल्ल्याच्या भीतीने कोणीही घराबाहेर पडायला तयार नाही. इथली मुलंही शाळेत जात नाहीत. याआधीही या गावात ध्रुवीय अस्वलं आली होती. रशियन माध्यमांनीही या प्रश्नाला महत्त्व दिलं आहे. ध्रुवीय अस्वलं माणसांवर हल्ला करू शकतात. त्यांचं वजन जवळपास ६०० किलो असतं. ही अस्वलं ४० किलोमीटर प्रतीतास एवढ्या वेगाने धावू शकतात. ध्रुवीय अस्वलं ही संरक्षित प्रजाती आहे. त्यामुळे त्यांना मारता येत नाही. या अस्वलांना मारणं बेकायदेशीर असल्यामुळे लोकांपुढे घरात बसण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही. उन्हाळ्यात बर्फ वितळू लागल्यानंतर ध्रुवीय अस्वलं मानवी वस्तीत प्रवेश करतात. प्राणी आणि माणूस यांच्यातला संघर्ष नवा नाही. याच कारणामुळे जागतिक तापमानवाढीवर उपाय करणं गरजेचं आहे.

## मुख्यमंत्र्यांच्या गाड्यांमध्ये पाणी?

काही पेट्रोल पंपावर इंधन भरल्यावर वाहनांचे ॲव्हरेज कमी येते, अशा तक्रारी अनेकदा ऐकायला मिळतात. काही वेळा पेट्रोल पंपावरील पेट्रोल किंवा डिझेलमध्ये पाण्याचा अंश असल्याच्या तक्रारी असतात. आता चक्क मुख्यमंत्र्यांच्या ताफ्यातील इनोव्हा कारमध्ये पेट्रोल पंपावर इंधनाऐवजी पाणी भरल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. हा प्रकार मध्य प्रदेशात घडला.

भाजप नेते आणि मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांच्या ताफ्यातील १९ इनोव्हा गाड्या डिझेल भरण्यासाठी रतलाम जिल्ह्यातील ढोसी गावातील भारत पेट्रोल पंपावर गेल्या होत्या; मात्र त्यानंतर काही वेळातच या गाड्या बंद पडल्याने ही घटना उघडकीस आली. यादव यांचा ताफा रतलाम येथे 'एमपी राईज २०२५ कॉन्क्लेव्ह'साठी आला होता.



मुख्यमंत्र्यांच्या ताफ्यातील गाड्या अचानक बंद पडल्याने प्रशासकीय अधिकारी व पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर कारमधील डिझेलच्या टाकीत पाणी आढळून आल्याने सर्वांच्याच भुवया उंचावल्या. त्यामुळे, पेट्रोल पंपावरच गाड्यांचे इंधन टँक उघडून तपासणी करण्यात आली. दरम्यान इंदूरवरून दुसऱ्या गाड्या मागवून मुख्यमंत्र्यांचा ताफा पुढे नेण्यात आला. या घटनेनंतर प्रशासनाने ढोसी गावातील हा पेट्रोल पंप सील केला असून पुढील तपास आणि चौकशी करण्यात येत आहे. इंधन टँक उघडण्यात आले त्या वेळी या टँकमध्ये २० लिटर डिझेलमध्ये १० लिटर पाणी असल्याचे निष्पन्न झाले. विशेष म्हणजे सर्वच गाड्यांची हीच अवस्था होती. एका ट्रकमध्ये २०० लिटर डिझेल टाकले होते. तो ट्रकही काही वेळानंतर रस्त्यावरच बंद पडला. पावसाच्या पाण्यामुळे टाकीत पाणी गेल्याची सारवासारव तेथील कर्मचाऱ्यांनी केली.

## उंटांचं रुग्णालय

प्राण्यांसाठीही रुग्णालयं असतात. प्राण्यांवर शस्त्रक्रियाही केल्या जातात. सर्वसाधारणपणे सर्व प्राण्यांवर एकाच ठिकाणी उपचार होतात. मात्र दुबईमधलं एक रुग्णालय खूपच अनोखं आहे. या रुग्णालयात फक्त उंटांवर उपचार केले जातात. हे रुग्णालय खास उंटांसाठीच तयार करण्यात आलं आहे. 'दुबई कॅमल हॉस्पिटल' या नावाने ते ओळखलं जातं. दुबई हा आखाती देश. या भागात वाळवंट असल्यामुळे वाहतुकीसाठी उंटांचा वापर होतो. हे रुग्णालय उभारण्यासाठी भारतीय चलनात सुमारे ७१ कोटी रुपये खर्च झाले आहेत. हे रुग्णालय २०१७ मध्ये सुरू झालं होतं. उंटांसाठीचं हे खास रुग्णालय आता जगभर प्रसिद्ध झालं आहे. या रुग्णालयात संयुक्त अरब अमिरातीतून उंट आणले जातात. इथे ६५ कर्मचारी आहेत. त्यात परदेशी तज्ज्ञांचाही समावेश आहे. या ठिकाणी एकाच वेळी २२ उंटांवर उपचार करण्याची सोय आहे. उंटांवर उपचार करण्यासाठी बरेच पैसे




आकारले जातात. अल्ट्रासाउंड चाचणीसाठी आठ हजार रुपये आकारले जातात तर साध्या शस्त्रक्रियेसाठी ७० हजार रुपये घेतले जातात. या ठिकाणी पाच मीटर उंचीचं एंडोस्कोपी मशीन आहे. जगभरात अशी फक्त तीन एंडोस्कोपी मशीन्स आहेत. यापैकी दोन अमेरिकेत आहेत. हाड मोडलेल्या उंटांना इथे आणलं जातं. संयुक्त अरब अमिरातीत उंटांच्या मॅरेथॉनचं आयोजन केलं जातं. या दरम्यान उंटांना दुखापती होतात. अशा उंटांना इथे आणलं जातं.

## विमानातील 'पाहुण्या'मुळे पळापळ



अहमदाबाद विमान अपघातानंतर लोकांच्या मनात आता विमान प्रवासाची भीती निर्माण झाली आहे. गेल्या महिन्याभरात घडलेल्या अनेक घटनांमुळे हवाई प्रवास आता सुरक्षित राहिला आहे की नाही, असा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे आता विमानात बसतानादेखील प्रवाशांच्या मनात एक भीती असते, किंवा काही गडबड दिसली तरी प्रवशांमध्ये गोंधळ निर्माण होतो. असेच काहीसे एका विमान प्रवासादरम्यान घडले.

विमान उड्डाण घेणारच होते तोच एक गोंधळ सुरू झाला. प्रवासी आपले सीट सोडून इकडे तिकडे पळू लागले. ही घटना घडली आहे ऑस्ट्रेलियात. ऑस्ट्रेलियामध्ये एका देशांतर्गत विमानात सर्व प्रवासी विमानात बसले होते आणि ते विमानाच्या उड्डाणाची वाट पाहत होते. दरम्यान विमानात एक प्रवासी सामानाच्या केबिनमध्ये त्याचे सामान ठेवत होता. त्याचदरम्यान, त्याला तिथे काहीतरी विचित्र हालचाल होताना दिसली. त्याने जवळ जाऊन पाहिले आणि तो घाबरला आणि संपूर्ण विमानात गोंधळ उडाला.

व्हर्जिन ऑस्ट्रेलियाचे ब्रिस्बेनला जाणारे विमान व्हीए ३३७ प्रवाशांना घेऊन उड्डाण करण्याच्या तयारीत होते. तेवढ्यात एका प्रवाशाला केबीनमध्ये सामान ठेवताना चक्क साप दिसला. त्याला पाहून सर्व प्रवासी घाबरले. दरम्यान सर्पमित्र मार्क पेली यांना याची माहिती मिळताच ते तातडीने घटनास्थळी पोहोचले. त्यांनी सांगितले, हा सुमारे दोन फूट लांबीचा हिरवा साप होता. तो विषारी नव्हता.

विमान कंपनीच्या एका अधिकाऱ्याने सांगितले, सापामुळे विमान उड्डाणाला सुमारे दोन तास उशीर झाला. पेले यांच्या मते तो प्रवाशांच्या सामानातून आला असावा. व्हर्जिन ऑस्ट्रेलियाने एका निवेदनात म्हटले, प्रवाशांची सुरक्षा ही त्यांची प्राथमिकता आहे आणि म्हणूनच त्यांनी साप दिसल्यानंतर लगेच उड्डाण थांबवले आणि आवश्यक ती सर्व पावले उचलली. प्रवाशांना झालेल्या गैरसोयीबद्दल




त्यांनी माफीही मागितली.

ऑस्ट्रेलियातील घरांमध्ये साप आढळण्याच्या घटना नवीन नाहीत. ऑस्ट्रेलिया हे जगातील सर्वात विषारी सापांचे घर असल्याचे म्हटले जाते. या वेळी सापडलेला साप विषारी नसला तरी विमानात साप सापडणे हे नक्कीच विचित्र वाटण्यासारखे आहे.

## तो बनला भूभागाचा राजा

जगातली काही ठिकाणं 'नो मेन्स लँड' म्हणून ओळखली जातात. दोन देशांच्या सीमेलगतच्या भागाला 'नो मेन्स लँड' म्हटलं जातं. या भागावर कोणाचाही अधिकार नसतो. म्हणूनच जगातली कोणतीही व्यक्ती अशा ठिकाणांवर अधिकार गाजवू शकते. आफ्रिकेतही असंच एक ठिकाण आहे. या जागेवर कोणाचाही अधिकार नाही. इथल्या वाळवंटी, कोरड्या ठणठणीत जमिनीवर कोणालाही हक्क गाजवायचा नाही. मात्र जगभ्रमंती करणारे काही अवलिये या ठिकाणी येतात आणि स्वत:ला प्रदेशाचा राजा घोषित करून टाकतात. आफ्रिकेतलं हे ठिकाण बीर ताविल म्हणून ओळखलं जातं. २०६० चौरस किलोमीटरचा हा भूभाग सर्वांनाच नकोसा झाला आहे. हा भूभाग इजिप्त आणि सूदान या दोन देशांच्या सीमारेषेलगत आहे. पण त्यावर दोन्हीपैकी एकाही देशाचा अधिकार नाही. इथल्या जमिनीवर गवताचं पातंही दिसत नाही. रखरखीत अशी ही जमीन सर्वांनाच नकोशी झाली आहे. २०१४ मध्ये अमेरिकेतला एक शेतकरी इथे आला होता. त्याने या भूभागावर एक झेंडा फडकवला आणि स्वत:ला उत्तर सूदानचा राष्ट्रपती घोषीत करून टाकलं. यानंतर २०१७ मध्ये एक भारतीय तरुण या ठिकाणी पोहोचला. सुयश दीक्षित असं त्याचं नाव. मध्य प्रदेशमधल्या सुयश दीक्षितला भटकंती करायला खूप आवडतं. त्याने या भूभागाला 'किंग्डम ऑफ दीक्षित' हे नाव दिलं. त्याने वेगळा झेंडाही तयार केला. वडिलांना इथल्या पंतप्रधानपदी नेमलं. या वाळवंटी प्रदेशात पालीच आढळतात. त्यामुळे या पालीला राष्ट्रीय प्राणी घोषित करण्याचा निर्णयही सुयशने घेतला होता.



# डॉन चित्रपटाचे दिग्दर्शक चंद्रा बारोट काळाच्या पडद्याआड

**मुंबई, दि. २० प्रतिनिधी**

ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक आणि १९७८ साली प्रदर्शित झालेल्या 'डॉन' या कल्ट क्लासिक चित्रपटाचे दिग्दर्शकचंद्रा बारोट यांचे रविवारी सकाळी मुंबईतील वांद्रे येथील रुग्णालयात निधन झाले. ते ८६ वर्षांचे होते. त्यांच्या निधनाने हिंदी चित्रपटसृष्टीवर शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, त्यांच्या पत्नी दीपा बारोट यांनी एका या वृत्ताला दुजोरा दिला. "ते गेल्या सात वर्षांपासून पल्मोनरी फायब्रोसिस (फुफ्फुसांचा गंभीर आजार) या आजाराशी झुंज देत होते," अशी माहिती त्यांनी दिली. त्यांच्यावर वांद्रे येथील गुरु नानक रुग्णालयात डॉ. मनीष शेट्टी यांच्या देखरेखीखाली उपचार सुरू होते. यापूर्वी त्यांना जसलोक रुग्णालयातही दाखल करण्यात आले होते. मात्र, अखेर त्यांची प्राणज्योत मालवली.

चंद्रा बारोट यांचे नाव घेताच डोळ्यासमोर येतो तो म्हणजे १९७८ सालचा 'डॉन'. अमिताभ बच्चन, झीनत अमान आणि प्राण यांच्या अभिनयाने सजलेल्या या चित्रपटाने लोकप्रियतेचे सर्व विक्रम मोडले होते. 'डॉन को पकड़ना मुश्किल ही नहीं, नामुमकिन है' यांसारखे संवाद आजही प्रेक्षकांच्या मनात घर करून आहेत. या एकाच चित्रपटाने चंद्रा बारोट यांना भारतीय चित्रपटसृष्टीत अजरामर केले. दिग्दर्शक चंद्रा बारोट त्यांच्या 'डॉन' चित्रपटाचा रिमेक बनवणारे चित्रपट निर्माते फरहान अख्तर यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत यावर दुःख व्यक्त केले आहे. चित्रपट निर्माते फरहान अख्तर, ज्यांनी २००६ मध्ये त्यांच्या 'डॉन' चित्रपटाचा रिमेक





बनवला. त्यांनाही या बातमीने मोठा धक्का बसला आहे. फरहान यांनी इंस्टाग्रामवर चंद्रा बारोट यांची आठवण काढत लिहिले आहे की, "मूळ 'डॉन'चे दिग्दर्शक आता आपल्यात नाहीत, हे ऐकून खुप दुःख झाले. त्यांच्या कुटुंबीयांप्रति माझ्या मनःपूर्वक संवेदना."

'डॉन'सारखा कल्ट-क्लासिक चित्रपट देण्याव्यतिरिक्त, चंद्रा बारोट यांनी अनेक उत्कृष्ट हिंदी चित्रपटांमध्ये सहाय्यक दिग्दर्शक म्हणूनही काम केले होते. त्यांनी मनोज कुमार यांच्या 'पूरब और पश्चिम', 'यादगार' आणि 'रोटी कपडा और मकान' यांसारख्या प्रसिद्ध चित्रपटांसाठी सहाय्यक दिग्दर्शन केले होते. चंद्रा बारोट यांनी बंगाली चित्रपटांमध्येही आपले नशीब आजमावले होते. मात्र, ते स्वतः नेहमी म्हणायचे की, प्रेक्षक त्यांना केवळ आणि केवळ अमिताभ बच्चन यांच्या 'डॉन' चित्रपटासाठीच कायम लक्षात ठेवतील.

२००६ मध्ये जेव्हा फरहान अख्तर, चंद्रा बारोट यांच्या 'डॉन'चा रिमेक बनवत होते, तेव्हा त्यांनी यावर आपली प्रतिक्रिया दिली होती. शाहरुखच्या 'डॉन'च्या प्रदर्शनापूर्वी एका जुन्या मुलाखतीत चंद्रा बारोट यांनी आनंद व्यक्त करत म्हटले होते की, "जेव्हा मी अमिताभ बच्चन यांच्यासोबत 'डॉन' बनवत होतो, तेव्हा मला इतके मीडिया अटेन्शन मिळाले नव्हते. पण काळासोबत तो चित्रपट 'कल्ट' ठरला. फरहान अख्तरने तो पुन्हा बनवल्याचा मला आनंद आहे. मला असे वाटले की, अनेक वर्षांनंतर माझ्या कामाची पोचपावती मला मिळत आहे."

# तीन मुलांसह आई वडिलांनी मृत्यूला कवटाळले

**अहमदाबाद, दि. २० वृत्तसंस्था**

तीन मुलांसह आई वडिलांनी मृत्यूला कवटाळल्याची घटना अहमदाबादमध्ये घडली. ही सामूहिक आत्महत्येची घटना आहे असं पोलिसांनी म्हटलं आहे. विपुल वाघेला आणि त्याच्या कुटुंबाचे मृतदेह आढळून आल्याने एकच खळबळ उडाली आहे. दरम्यान त्याच्या नातेवाईकांचं म्हणणं आहे की आर्थिक चणचण भासू लागल्याने या दोघांनी मुलांसह आत्महत्या केली असण्याची दाट शक्यता आहे.

विपुल वाघेला आणि त्याचं संपूर्ण कुटुंब आज सकाळी त्यांच्या अहमदाबादमधील घरात मृतावस्थेत आढळलं. या घटनेची माहिती तातडीने पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी या पाचही जणांना रुग्णालयात नेणलं. पण तिथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केलं. विपुल वाघेला, त्याची पत्नी सोनल वाघेला आणि तीन मुलं करीना, मयूर आणि प्रिन्सी या सगळ्यांचा या घटनेत मृत्यू झाला. या सगळ्यांचे मृतदेह त्यांच्या घरातल्या पलंगांवर पडलेले होते अशी माहिती पोलिसांनी दिली. या घटनेचा पुढील तपास पोलीस करत आहेत अशी माहितीही त्यांनी दिली.

गेल्या काही दिवसांपासून वाघेला कुटुंबाला आर्थिक अडचणी जाणवत होत्या. बंगोडारा या ठिकाणी ते भाडे तत्त्वावर असलेल्या घरात राहात होते. विपुल वाघेला रिक्षा चालक होते आणि त्यांच्या घरात कमाई करणारे ते एकटेच होते. एका नातेवाईकाने सांगितलं की विपुलने कर्ज काढून रिक्षा विकत घेतली होती. मात्र त्याचे हप्ते भरताना त्याला नाकी नाऊ येत होते. आर्थिक अडचणी भासत असल्याने विपुल आणि त्याची पत्नी कायमच तणावात असायचे. बहुदा याच कारणामुळे त्यांनी टोकाचं पाऊल उचललं असावं.

वरिष्ठ पोलीस अधिकारी वागिशा जोशी म्हणाल्या की त्यांना रात्री उशिरा या घटनेची माहिती फोनवरुन मिळाली. आम्ही सगळे जेव्हा तिथे पोहचलो तेव्हा आम्हाला पाच जणांचे मृतदेह आढळले. या प्रकरणाची चौकशी सुरु आहे. तसंच शवविच्छेदनासाठी हे मृतदेह पाठवण्यात आले आहेत. आर्थिक अडचणीमुळे हे घडल्याचं बोललं जातं आहे मात्र या घटनेचे सगळे पैलू आम्ही तपासून पाहतो आहोत.

# लाईफस्टाईलच्या जोरावर अनेक उद्योजकांना फसवले

## २०० कोटींच्या घोटाळ्याप्रकरणी एकाला अटक

**मंगळुरू, दि. २० वृत्तसंस्था**

श्रीमंत व्यक्ती आणि उद्योजकांना फसवून स्वतः ऐश आरामात राहणाऱ्या ४५ वर्षीय रोहन सालदान्हा याला मंगळुरू पोलिसांनी अटक केली आहे. या आरोपीने तब्बल २०० कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. हा आरोपी जगत असलेल्या रहाणीमानामुळे याच्यावर अनेक महिन्यांपासून पोलिसांना संशय होता.

सालदान्हा हा स्वत:ला एक हाय-प्रोफाईल बिझनेसमेन असल्याचे सांगायचा आणि त्या भागाच्या बाहेरील लोकांना लक्ष्य करत असे. इतकेच नाही तर तो इतर राज्य आणि जिल्ह्यातील लोकांना लक्ष्य करत होता. हा संभावित पीडितांना त्याच्या जेप्पीनामोगारू येथील पॉश बंगल्यात बोलवून घ्यायचा. येथील वातावरण, महागडी मद्य आणि अत्यंत सभ्य वर्तनामुळे त्याच्यावर लोक विश्वास ठेवत असत.

समाजातील प्रतिमा आणि त्याचे उद्योगांसंबधीत माहिती यामध्ये तफावत आढळून आल्यानंतर मंगळुरू पोलिसांनी तपास सुरू केला. या आरोपीची चौकशी केली असता एक मोठं फसवणुकीचं रॅकेट उघडकीस आलं. ही फसवणूक ही मानसिक दिशाभूल आमि लक्झरी जीवनशैलीचं अमिष दाखवून केली जात असे. सालदान्हाने पीडितांना ५० कोटी ते १०० कोटी रुपयांचे व्यावसायिक कर्ज मिळवून देण्याचे आश्वासन देऊन फसवल्याचे सांगितले जात आहे.



पण त्याच्या आधी त्याने कर्जाच्या प्रक्रियेचा भाग म्हणून त्याच्या पीडितांकडून स्टॅम्प ड्युटी म्हणून ५ कोटी ते १० कोटी रुपये आधीच घेतले. त्याचं भव्य गर आणि त्याचं गोड बोलणं यावर विश्वास ठेवून अनेक उद्योजकांनी त्याला मोठ्या प्रमाणात रोखीने पैसे दिले. यापैकी बऱ्याच जणांना तर त्याची पार्श्वभूमी तपासावी किंवा कायदेशीर गॅरंटी घ्यावी अशी गरजही वाटली नाही.

अवघ्या तीन महिन्यांच्या कालावधीत सलदान्हा याने असे फसवेगिरी करून किमान ४५ कोटींचे व्यवहार केले. तर गेल्या अनेक वर्षात झालेल्या फसवणूकीचा आकडा का २०० कोटींपेक्षा जास्तचा आहे. त्याने फसवलेल्या लोकांमध्ये सहज पद्धतीने कर्ज मिळेल या अपेक्षेने आलेल्या अनेक प्रभावशाली उद्योजकांचा समावेश आहे.

# हिमाचल प्रदेशमध्ये दोन सख्ख्या भावांचा एकाच मुलीशी विवाह

**शिमला, दि. २० वृत्तसंस्था**

देशात लग्न सोहळ्याच्या अनेक वेगवेगळ्या परंपरा आपल्याला पाहायला मिळतात. सध्या हिमाचल प्रदेशमधी एक लग्न विशेष चर्चेत आले आहे आणि त्यासाठी कारण देखील तसेच आहे. हिमाचल प्रदेशमधील शिल्लई गावातील एक महिलेशी हट्टी जामातीच्या दोन भावांनी एकदाच लग्न केले आहे. शेकडो लोकांच्या उपस्थितीत हा विवाह सोहळा पार पडला. सध्या कालबाह्य झालेल्या पॉलीएंड्री म्हणजे एकाच वेळी एकापेक्षा जास्त पती असण्याच्या प्रथेनुसार हे लग्न लावण्यात आले. दरम्यान वधू सुनिता चौहान आणि वर प्रदीप आणि कपिल नेगी यांनी यावेली स्पष्ट केले की त्यांनी हा लग्नाचा निर्णय कोणत्याही दबावाखाली घेतलेला नाही.

सिरमौर जिल्ह्यातील ट्रान्स-गिरी भागातील या लग्नसोहळ्यात स्थनिक लोकगीते आणि नृत्य सादर करण्यात आली. १२ जुलै रोजी सुरू झालेला हा सोहळा पुढील



तीन दिवस हा सुरू होता. दरम्यान या लग्न समारंभाचे व्हिडीओ इंटरनेटवर व्हायरल झाले आहेत.

विशेष म्हणजे हिमाचल प्रदेशच्या महसूल कायद्याने या परंपरेला मान्यता दिलेली आहे आणि याला 'जोडीदरा' असे नाव देण्यात आले आहे. ट्रान्स-गिरी भागातील बधाना गावात गेल्या सहा वर्षात अशा प्रकारचे पाच विवाह झाले आहेत.

कुन्हात गावातील रहिवासी असलेल्या सुनिताने सांगितले की तिला या प्रथेबद्दल माहिती होती आणि तिने कुठल्याही दबावाशिवाय याचा निर्णय घेतला, तसेच आपण या नात्याचा आदर करतो असेही तिने सांगितले.

प्रदीप हा शिल्लई गावातील असून तो एका सरकारी विभागात नोकरी करतो आणि त्याचा लहान भाऊ कपिल हा परदेशात नोकरी करतो.

"आम्ही सार्वजनिकरित्या या परंपरेचे अनुसरण केले कारण आम्ही याचा अभिमान बाळगतो आणि हा आमचा एकत्रित निर्णय होता," असे प्रदीप याने सांगितले.

या लग्नाबाबत कपिल म्हणाला की जरी तो परदेशात राहत असेल तरी या लग्नाच्या माध्यमातून, "आम्ही आमच्या पत्नीला एक संयुक्त कुटुंब म्हणून आधार, स्थिरता आणि प्रेम मिळेल याची काळजी घेत आहोत. आमचा कायम पारदर्शकतेवर विश्वास राहिला आहे."

# प्रॉपर्टी शेअरचा ४७३ कोटी रुपयांचा आयपीओ आज उघडणार




लोकार्थ

प्रॉपर्टी शेअर इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (एसएम रीट) या भारतातील पहिल्या नोंदणीकृत लघु आणि मध्यम रिअल इस्टेट गुंतवणूक ट्रस्टने ट्रस्ट अंतर्गत त्यांची दुसरी योजना- प्रॉपर्टी शेअर टिटानियासाठी ट्रस्टची प्रमुख माहिती आणि योजनेची प्रमुख माहिती (ऑफर डॉक्युमेंट्स) दाखल केली आहे, जी एकूण ४७३ कोटी रुपयांपर्यंत आहे.

बोली/इश्यू सोमवार, २१ जुलै २०२५ रोजी उघडेल आणि शुक्रवार, २५ जुलै २०२५ रोजी बंद होईल. इश्यूसाठी किंमतपट्टा प्रति टायटानिया युनिट १०.० लाख रु. ते १०.६ लाख रु. आहे. किमान बोलीचा आकार किमान गुंतवणूक रकमेसाठी १०,००,००० रुपये आहे. किमान १ टायटानिया युनिटसाठी आणि त्यानंतर १ टायटानिया युनिटच्या पटीत बोली लावता येतात. आयपीओमध्ये टायटानिया युनिट्सच्या नवीन इश्यूचा समावेश आहे आणि विक्रीसाठी ऑफर नाही (इश्यू). हा इश्यू बुक बिल्डिंग प्रक्रियेद्वारे आणि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (रिअल इस्टेट इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट) रेग्युलेशन्स, २०१४ (आरईआयटी रेग्युलेशन्स) आणि ११ जुलै २०२५ च्या आरईआयटी मास्टर सर्क्युलरचे पालन करून केला जात आहे, ज्यामध्ये आरईआयटी रेग्युलेशन्सनुसार, निव्वळ इश्यूच्या ७५ टक्क्यांपेक्षा जास्त वाटप संस्थात्मक गुंतवणूकदारांना प्रमाणात करता येईल आणि उर्वरित २५ टक्के निव्वळ इश्यू बिगर-संस्थात्मक गुंतवणूकदारांना वाटप करता येईल.प्रॉपर्टी शेअर योजनेच्या टायटानिया युनिट्सपैकी किमान ५ टक्के गुंतवणूक व्यवस्थापक योगदान म्हणून ऑफरिंगमध्ये गुंतवेल.

## भारताच्या हरित संक्रमणाला पाठिंबा देण्यासाठी WTC चा पुढाकार

भारत देश त्याच्या निव्वळ-शून्य लक्ष्यांकडे धावत असताना, उद्योग तज्ञ, धोरणकर्ते, शास्त्रज्ञ, विद्वानांसह विविध भागधारकांचा गट वर्ल्ड ट्रेड सेंटर मुंबई येथे "वन आणि वित्त हवामान गुंतवणुकीसाठी उत्प्रेरक म्हणून कार्बन बाजारपेठा" या विषयावरील चर्चासत्रासाठी एकत्र आला होता.एमव्हीआयडीसी WTCमुंबई आणि ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीज यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या या कार्यक्रमात भारतातील हवामान संक्रमणाला गती देण्यासाठी कार्बन बाजारपेठा आणि वन-आधारित वित्तपुरवठा यांच्या उदयोन्मुख क्षमतेचा शोध घेण्यासाठी सुमारे १५० सहभागींना एकत्र आणले.भारत कार्बन क्रेडिट ट्रेडिंग स्कीम द्वारे सक्रियपणे कार्बन बाजार विकसित करत आहे, ज्याचा उद्देश हरितगृह वायू उत्सर्जन कमी करणे आणि शाश्वत पद्धतींना प्रोत्साहन देणे आहे. ऊर्जा संवर्धन (सुधारणा) कायदा, २०२२ द्वारे स्थापित कार्बन व्यापारासाठी अनुपालन आणि स्वैच्छिक यंत्रणा दोन्ही सादर करते. २०३० पर्यंत (२००५ च्या पातळीपासून) भारताच्या जीडीपीच्या उत्सर्जन तीव्रतेत ४५% घट आणि २०७० पर्यंत निव्वळ शून्यावर पोहोचण्याच्या त्याच्या अद्ययावत राष्ट्रीय निर्धारित योगदान (एनडीसी) साध्य करण्यासाठी सीसीटीएसची रचना करण्यात आली आहे.

## सोमय्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या एमबीए प्रोग्राम्ससाठी ६७६ विद्यार्थ्यांना प्रवेश

महाराष्ट्रातील एएसीएसबी-मान्यताप्राप्त बी-स्कूल, के जे सोमय्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (केजेएसआयएम) ने २०२५-२०२७ शैक्षणिक वर्षासाठी त्यांच्या प्रमुख एमबीए, एमबीए इन हेल्थकेअर मॅनेजमेंट आणि एमबीए इन स्पोर्ट्स मॅनेजमेंट प्रोग्राम्समध्ये ६७६ विद्यार्थ्यांच्या एका नवीन गटाचे स्वागत केले आहे. हा कार्यक्रम प्रमुख पाहुणे, टाटा मोटर्सचे माजी व्यवस्थापकीय संचालक आणि उपाध्यक्ष श्री रवी कांत यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता.या वर्षीचा गट भारतातील २२ राज्यांमधील विद्यार्थ्यांचे प्रतिनिधित्व करतो, ज्यामध्ये महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि गुजरातमधील विद्यार्थ्यांची उपस्थिती आहे, तसेच ईशान्य आणि दक्षिण भारतातील नोंदणीमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. येणाऱ्या बॅचमध्ये ५६% पुरुष आणि ४४% महिला विद्यार्थ्यांचा समावेश आहे, जे कार्यक्रमांमध्ये संतुलित लिंग प्रतिनिधित्व दर्शवते.शैक्षणिकदृष्ट्या, या बॅचमध्ये वाणिज्य, व्यवस्थापन, अभियांत्रिकी, कला आणि शुद्ध विज्ञान यासारख्या विविध पार्श्वभूमींचे मिश्रण आहे. ७२% विद्यार्थी नवीन पदवीधर आहेत, तर २८% पूर्वी उद्योग अनुभव घेऊन येतात, जे वर्गात मौल्यवान दृष्टिकोन आणि व्यावहारिक अंतर्दृष्टी आणतात.

या वर्षीचा प्रेरण कार्यक्रम 'परिवर्तन' मध्ये आधारित होता. वैयक्तिक आणि व्यावसायिक विकासाला चालना देण्यासाठी एक परिवर्तनकारी चौकट. दोन पायाभूत स्तंभांवर बांधलेला पोषण क्षमता (एनपी) आणि विद्यार्थी प्रगती निर्देशांक (एसपीआय) ही चौकट विद्यार्थ्यांना सुरुवातीपासूनच त्यांच्या विकासाची मालकी घेण्यास सक्षम करते.

## हेल्थकेअर डिलिव्हरी अँड डायग्नोस्टिक्सच्या महसुलात अनुक्रमे १६% ची वाढ

आघाडीच्या गुंतवणूक बँक इक्विरस कॅपिटलने आरोग्य सेवा क्षेत्राच्या विश्लेषणानुसार, जेनेरिक आणि ब्रँडेड फॉर्म्युलेशन उद्योग अडचणींचा सामना करत असताना आरोग्य सेवा वितरण आणि डायग्नोस्टिक्स कंपन्यांनी चांगले निकाल दिले. आर्थिक वर्ष २५ मध्ये हेल्थकेअर डिलिव्हरी अँड डायग्नोस्टिक्सने पोस्ट केलेली महसूल वाढ आर्थिक वर्ष २३-२५ च्या CAGR पेक्षा जास्त होती.आर्थिक वर्ष २३-२५ मध्ये सीएजीआरच्या तुलनेत आर्थिक वर्ष २५ मध्ये महसूल वाढ झाली सीडीएमओ ११% विरुद्ध ८%, पॅन इंडिया रुग्णालये १६% विरुद्ध १४.७%, एपीआय फार्मा १२.६% विरुद्ध ७.६% आणि डायग्नोस्टिक्स १३.६% विरुद्ध १२.६%.अशी वाढ नोंदवली गेली.




एआरपीओबी, किंवा प्रति व्यापलेल्या बेड सरासरी महसूलाने आर्थिक वर्ष २३-२५ मध्ये १४.७% च्या तुलनेत आर्थिक वर्ष २५ मध्ये १६% वर उच्च महसूल वाढ केली आहे. मॅक्स हेल्थकेअरने नवीन बेडसाठी १,२००-१,५०० कोटी रुपये जोडले; अपोलोने टियर-२ शहरांमध्ये २००० कोटी रुपयांची गुंतवणूक केली आणि फोर्टिसने अपग्रेडसाठी ८०० कोटी रुपये मिळवले.कंपन्या व्हॉल्यूम वाढीसाठी टियर २ आणि ३ शहरांमध्ये डायग्नोस्टिक सेंटरचा विस्तार करत आहेत. ऑनलाइन खेळाडूंकडून सवलतीमुळे डायग्नोस्टिक किंमत मर्यादित आहे. प्रत्येक केंद्रावर जास्त संख्येने येणाऱ्या ग्राहकांची संख्या ही उच्च फ्रँचायझी/नमुना संकलन केंद्रांद्वारे होणाऱ्या वाढीचे संकेत देते. पीपीपी आणि फ्रँचायझी मॉडेल्सच्या मदतीने डायग्नोस्टिक सेंटर्सच्या विस्तारामुळे कंपन्यांना कमी संख्येने येणाऱ्या शहरांमध्ये प्रवेश करता आला आहे आणि त्याचबरोबर वाढत्या चाचणी संख्येचा फायदाही झाला आहे.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# पंतप्रधान नरेंद्र मोदी या आठवड्यात ब्रिटनच्या दौऱ्यावर

## द्विपक्षीय व्यापार करारावर सही करणार

**नवी दिल्ली, दि. २० वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी या आठवड्यात ब्रिटन आणि मालदीवच्या दौऱ्यावर जाणार आहेत. हा दौरा २३ ते २६ जुलै या कालावधीत होणार असून व्यापार करार आणि राजकीय चर्चा यांच्या माध्यमातून देशाचे राजनैतिक संबंध अधिक दृढ करणे हा त्यामागील उद्देश असल्याचे सांगण्यात आले.

दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात, २३ आणि २४ जुलैला पंतप्रधान मोदी ब्रिटनला जाणार आहेत. तिथे ते ऐतिहासिक भारत-ब्रिटन मुक्त व्यापार करारावर (एफटीए) सही करणार आहेत. या करारामुळे दोन्ही देशांना एकमेकांची बाजारपेठ मोठ्या प्रमाणात उपलब्ध होणार असून व्यापारासाठी अधिक अनुकूल वातावरण निर्मिती होणार आहे. भारतातून ब्रिटनमध्ये होणाऱ्या ९९ टक्के निर्यातींवरील शुल्क कमी होणार असून व्हिस्की आणि कार यासारख्या ब्रिटिश वस्तूंच्या भारतात आयातीवरील शुल्क कपात होणार आहे. या करारावर गेले तीन वर्षे वाटाघाटी सुरू होत्या.

ब्रिटनचा दौरा आटोपून मोदी २५ जुलैला मालदीवला जाणार आहेत. तिथे ते ६०व्या राष्ट्रीय दिवस सोहळ्याचे प्रमुख पाहुणे असतील. मोहम्मद मुइझ्झू मालदीवचे अध्यक्ष झाल्यापासून मोदी यांचा हा पहिलाच मालदीव दौरा असणार आहे. दोन्ही देशांदरम्यानचे संबंध सुधारण्याचा प्रयत्न म्हणून या दौऱ्याकडे पाहिले जात आहे.

दरम्यान, भारत आणि चार युरोपीय देशांचा समावेश असलेल्या 'युरोपीयन फ्री ट्रेड असोसिएशन'दरम्यान (ईएफटीए) मुक्त व्यापार कराराची १ ऑक्टोबरपासून अंमलबजावणी सुरू होईल अशी माहिती केंद्रीय वाणिज्यमंत्री पीयूष गोयल यांनी शनिवारी दिली. या कराराअंतर्गत 'ईएफटीए' १५ वर्षांच्या कालावधीत भारतात १०० अब्ज डॉलरची गुंतवणूक करणार आहे. या करारावर दोन्ही बाजूंनी मार्च २०२४मध्ये सह्या करण्यात आल्या होत्या.

# उड्डाण करताच विमानाचे इंजिन पेटले

## डेल्टा एअरलाइन्सच्या बोइंग ७६७चे लॉस एंजेलिसमध्ये आपत्कालीन लँडिंग

**लॉस एंजेलिस, दि. २० वृत्तसंस्था**

डेल्टा एअरलाइन्सच्या अटलांटा येथे जाणाऱ्या विमानाला लॉस एंजेलिस आंतरराष्ट्रीय विमानतळावर शुक्रवारी आपत्कालीन लँडिंग करावी लागल्याचा प्रकार समोर आला आहे. लॉस एंजेलिस येथून उड्डाण केल्याबरोबर याच्या एका इंजिनला आग लागल्याने हे विमान तात्काळ जमिनीवर उतरावे लागले.

या घटनैचा थरारक व्हिडीओ देखील समोर आला आहे. डेल्टा एअरलाइनकडून चालवली जाणारी फ्लाइट ४४६, बोइंग ७६७-४०० विमान लॉस एंजेलिस विमातळावरून झेपावत असताना त्याच्या डाव्या बाजूच्या इंजिनध्ये आग लागल्याचे व्हिडीओमध्ये दिसत आहे. या व्हिडीओमध्ये विमानतळावर सुरक्षित परतण्याच्याआधी विमान लॉस एंजेलिस शहरावर गोल फिरताना पाहायला मिळत आहे.

मीडिया रिपोर्ट्सनुसार या घटनेत कोणीही जखमी झाल्याची नोंद नाही. विमानाने आपत्कालीन लँडिंग केल्याने, ते उतरचाच अग्निशामक दलाच्या कर्मचाऱ्यांनी आगीवर नियंत्रण मिळवले. हे विमान हार्ट्सफील्ड-जॅक्सन अटलांटा आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे निघाले होते.

डेल्टा एअरलाइन्सच्या प्रवक्त्याने या घटनेला दुजोरा दिला आहे. डेल्टा फ्लाइट ४४६ हे उड्डान केल्यानंतर विमानाच्या डाव्या इंजिनमध्ये बिघाड आढळून आल्यानंतर लगेचच लॉस एंजेलिस येथे परतले. विमान कंपनीने सांगितले की ते या घटनेच्या चौकशीत आणि सुरक्षा प्रोटोकॉलबद्दल ते पूर्ण सहकार्य करत आहेत. अमेरिकन विमान वाहतुकीवर लक्ष ठेवणाऱ्या फेडरल एव्हिएशन ॲडमिनिस्ट्रेशनने आग लागण्याचे कारण शोधण्यासाठी तपास सुरू केला आहे. तसेच अधिकाऱ्यांनी सांगितले की डाव्या इंजिनमध्ये नेमकी आग का लागली याची चौकशी केली जात आहे.

# कर्नाटक काँग्रेसचा अंतर्गत वाद पुन्हा चव्हाट्यावर

## उपमुख्यमंत्र्यांचे नाव घेण्यास मुख्यमंत्र्यांचा नकार

**बंगळुरू, दि. २० वृत्तसंस्था**

कर्नाटक काँग्रेसमधील अंतर्गत वाद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. शनिवारी मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी म्हैसूरमधील एका कार्यक्रमादरम्यान उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार यांचे नाव घेण्यास नकार दिला. या कार्यक्रमाचे नाव 'साधना सामवेश' होते हा कार्यक्रम काँग्रेस सरकारच्या कामगिरीची माहिती देण्यासाठी आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमादरम्यान जेव्हा एका काँग्रेस नेत्याने मुख्यमंत्र्यांना भाषणात डीके शिवकुमार यांचे नाव घेण्याची आठवण करून दिली, तेव्हा सिद्धरामय्या लगेचच संतापले. ते म्हणाले, "डीके शिवकुमार बंगळुरूमध्ये आहेत, येथे मंचावर नाहीत. आम्ही फक्त येथे उपस्थित असलेल्या लोकांचे स्वागत करतो. घरी असलेल्यांना नमस्कार कसा करायचा?" हे ऐकून काँग्रेस नेते शांतपणे त्यांच्या जागी बसले.

सिद्धरामय्या यांच्या या कृतीवर शिवकुमार यांच्या जवळचे नेते नाराज आहेत. एका ज्येष्ठ नेत्याने सांगितले की, "जर डी.के. शिवकुमार नसते तर काँग्रेस पुन्हा सत्तेत आली नसती. किमान मुख्यमंत्र्यांनी त्यांचे नाव मंचावर घ्यायला हवे होते." काही दिवसांपूर्वी सिद्धरामय्या यांनी एका मुलाखतीत म्हटले होते की, "शिवकुमार यांचा पक्षात फारसा प्रभाव नाही आणि त्यांच्यासोबत फक्त काही आमदार आहेत. या विधानानंतर दोन्ही नेत्यांमधील तणावाचे वृत्त माध्यमांमध्ये आले."

## माझ्यासाठी पक्षाच्या आधी देश - शशी थरूर

**नवी दिल्ली, दि. २० वृत्तसंस्था**

कोणत्याही पक्षाचे उद्दिष्ट एक चांगला भारत निर्माण करणे आहे. माझ्यासाठीही देश प्रथम येतो. देशाच्या सशस्त्र दलांना आणि सरकारला पाठिंबा देण्याची आपली भूमिका कायम राहणार आहे. कारण राष्ट्र सर्वोच्च आहे. पक्ष हे देशाला चांगले बनवण्याचे साधन आहेत, असे तिरुअनंतपुरमचे खासदार आणि काँग्रेसच्या संसदीय समितीचे सदस्य शशी थरूर यांनी सांगितले. कोणत्याही पक्षाचे उद्दिष्ट एक चांगला भारत निर्माण करणे आहे आणि हे लक्ष्य साध्य करण्याच्या सर्वोत्तम मार्गावर पक्षांना मतभेद करण्याचा अधिकार आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. काँग्रेसकडून शशी थरुर यांच्या पक्षनिष्ठेबद्दल टीका करण्यात आली होती. शांतता, सौहार्द आणि राष्ट्रीय विकास विषयावरील कार्यक्रमात बोलताना शशी थरूर यांनी सांगितले की, अलिकडे घडलेल्या घटनेनंतर मी सशस्त्र दलांना आणि आपल्या सरकारला पाठिंबा दिल्यामुळे अनेकांनी माझ्या भूमिकेवर खूप टीका केली आहे. पण मी जेव्हा भारताबद्दल बोलतो तेव्हा मी सर्व भारतीयांबद्दल बोलतो. मी माझ्या मुद्यांवर ठाम राहीन, कारण मला वाटते की ही देशासाठी योग्य गोष्ट आहे.